


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६४ वे * अंक ५१ * नांदेड * शनिवार, दि. २२ फेब्रुवारी २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# मराठी भाषेकडून राष्ट्राच्या सांस्कृतिक निर्माणाचे महान कार्य -नरेंद्र मोदी

## राजधानीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उत्साहात उद्घाटन

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भाषा केवळ संवादाचे माध्यम नसून ती संस्कृतीची संवाहक असते. भाषा समाजातच जन्मतात आणि समाजाच्या निर्मितीत मोठी भूमिका निभावतात. मराठी भाषेने महाराष्ट्रातीलच नव्हे देशातील अनेक महापुरूषांच्या विचारांना अभिव्यक्ती देऊन सांस्कृतिक निर्माणाचे महान कार्य केले आहे, असे गौरवोद्गार देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी येथे काढले.

नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संमेलनाचे स्वागताध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार, संमेलनाच्या नियोजित अध्यक्षा डॉ.तारा भवाळकर, मावळते अध्यक्ष डॉ.रवींद्र शोभणे, अखिल भारतीय म राठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा.उषा तांबे, कार्यवाह डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, कोषाध्यक्ष प्रकाश पागे, संमेलनाचे निमंत्रक संजय नहार



आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

साहित्य संमेलनासाठी आलेल्या सर्वांचे मराठीत स्वागत करून मोदी म्हणाले, मराठी साहित्य संमेलन एका भाषेपुरते मर्यादित नाही. त्यास स्वातंत्र्य संग्रामाचा गंध असून तो एक मोठा सांस्कृतिक वारसा आहे. १८७८ पासून देशातील अनेक महान व्यक्तींनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले. या परंपरेशी जोडेले जाण्याचा मला विशेष आनंद आहे. जागतिक मातृभाषा दिनाचे औचित्य साधून होत असलेले संमेलनाचे आयोजन प्रशंसनीय आहे. ज्ञानेश्वरांनी 'माझ्या मराठाचि बोलू कौतुके, अमृताते पैजा जिंके' असे म्हटले आहे. मराठी भाषेवर माझे खूप प्रेम आहे. मराठी भाषा शिकण्याचे प्रयत्न मी निरंतर करीत आहे. अशा मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचे काम पूर्ण करण्याची संधी मिळाल्याचे मला मोठे समाधान आहे, असेही मोदी यांनी सांगितले.

### वर्तमान काळात साहित्यिकांवर महत्वपूर्ण जबाबदारी –शरद पवार

संत परंपरेपासूनच सर्वसमावेशक विचार मांडण्याचे काम मराठी साहित्यिकांनी सातत्याने केले. महिला साहित्यिकांच्या योगदानाने मराठी साहित्य समृद्ध झाले आहे. समाजाला मार्गदर्शन करण्याचे काम साहित्यिकांनी केले. साहित्यिकांची जबाबदारी वाढली असून समाजाला समाजसुधारकांच्या विधायक मार्गाने नेण्याचे काम साहित्यिकाने करण्याची आवश्यकता आहे. नव्या पिढीला पुस्तकांशी बांधून ठेवण्यासाठी नव्या माध्यमांचा कल्पकतेने वापर करायला हवा. नव्या पिढीमध्ये साहित्याची गोडी टिकून राहिली तरच साहित्याला भवितव्य असेल. महिलांना अध्यक्षपदाचा मान अधिकाधिक मिळाला तर महिला साहित्यिकांची परंपरा आणखी वेगाने पुढे जाईल. राजकारण आणि साहित्यातील संबंध पूर्वीपासून आहे, ते परस्पराला पूरक आहेत, असे शरद पवार म्हणाले.

# महसुलच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचा नांदेडमध्ये थाटात प्रारंभ

## माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण





**नांदेड (प्रतिनिधी)–** महसूल विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन नांदेडमध्ये झाले. यावेळी ध्वजारोहण माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

महसूलच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा २१ ते २३ फेब्रुवारी नांदेडमध्ये होत आहेत. शुक्रवारी श्री गुरूगोविंद सिंघजी स्टेडियम येथे शुभारंभ झाला. यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे, खासदार प्रा. रविंद्र चव्हाण, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार जितेश अंतापूरकर, आमदार आनंद तिडके, आमदार ॲड. श्रीजया चव्हाण, अपर मुख्य सचिव राजेशकुमार, विभागीय आयुक्त डॉ. दिलीप गावडे, निवृत्त जिल्हाधिकारी अरुण डोंगरे, जीएसटीचे सहआयुक्त अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जालना जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ, हिंगोली जिल्हाधिकारी अभिनव गोयल, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, मनपा आयुक्त डॉ. महेश डोईफोडे, अपर आयुक्त महसूल नैना बोंदार्डे, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, अपर आयुक्त प्रदिप कुलकर्णी, नितीन महाजन, सहायक जिल्हाधिकारी अनुष्का शर्मा, मेघना कावली, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना माजी मुख्यमंत्री खासदार अशोक चव्हाण म्हणाले, महाराष्ट्राच्या महसूल विभागाच्या सर्व क्षेत्रातील वाटचाल गौरवास्पद आहे. कर्मचाऱ्यांवरील ताण-तणाव हलका करण्यामध्ये क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा उपयोगी ठरतात. या स्पर्धांना निधी कमी पडणार नाही, अशी तरतूद करण्याची सूचना केली. तत्पूर्वी त्यांनी ध्वजारोहण केले. तसेच खेळाडूंना शिस्त व सांघिक भावनेची शपथ दिली.

याप्रसंगी खासदार डॉ. अजित गोपछडे, खासदार प्रा. रविंद्र चव्हाण, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार जितेश अंतापूरकर, आमदार आनंद तिडके, आमदार बालाजी कल्याणकर यांनी शुभेच्छापर संबोधन केले.

यावेळी महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मण नरमवार, महाराष्ट्र राज्य तलाठी संघटनेचे प्रतिनिधी पोपटवार, महाराष्ट्र राज्य नायब तहसिलदार संघटनेचे अध्यक्ष किरण अंबेकर, महाराष्ट्र राजपत्रित संघटनेचे प्रतिनिधी डॉ. सचिन खल्लाळ, महाराष्ट्र राज्य अप्पर जिल्हाधिकारी संवर्गाचे प्रतिनिधी दिपाली मोतियेळे यांनीही संबोधित केले. यावेळी अविरत महसूल या राज्यस्तरीय स्मरणिकेचे अनावर करण्यात आले. राज्यातील जवळपास अडीच हजार कर्मचारी या स्पर्धे निमित्त नांदेडमध्ये आले आहेत. पुढील ३ दिवस ही स्पर्धा नांदेड येथे रंगणार असून क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे.

### महाराष्ट्राच्या प्रशासनाला विश्वासार्ह चेहरा देण्याचे काम महसूलचे –अपर मुख्य सचिव राजेश कुमार

कोणत्याही राज्याची, जिल्ह्याची ओळख तिथल्या महसूल प्रशासनाच्या कारभारावरून ठरते. राज्याचे प्रशासन कसे आहे हे महसूल कर्मचाऱ्यांच्या परिश्रम, वृत्ती व सचोटीवर ठरते. महसूल कर्मचाऱ्यांच्या सकारात्मक वृत्तीमुळे व दर्जेदार कामांमुळे देशात महाराष्ट्राची ओळख निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन राज्याच्या महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार यांनी केले.

पुढे ते म्हणाले, बारा वर्षानंतर या स्पर्धांचे आयोजन होत असल्याचा आनंद व्यक्त केला. या स्पर्धांचे नियोजन करणारे विभागीय आयुक्त दिलीप गावडे, नांदेडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, यांनी दर्जेदार स्पर्धा आयोजित केल्याबद्दल त्यांनी कौतूक केले. नांदेडमध्ये असणाऱ्या क्रीडा विषयक पायाभूत सुविधा, निवासाची व्यवस्था यामुळे याठिकाणी केवळ महसूलच्याच नव्हे तर अंतरराष्ट्रीय स्तरावरच्या स्पर्धा आयोजित केल्या जाऊ शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले. महसूल विभाग हा राज्याच्या प्रशासनाचा कणा असतो. यामुळे या ठिकाणी अधिकारी व कर्मचारी दर्जेदारच असतात मात्र फायलींमध्ये प्रशासनाचे कसब दाखवणारे आता मैदानावर आपले प्राविण्य दाखविणार असल्याचा आनंद आहे. अगदी शिपाईपासून, अपर मुख्य सचिवांपर्यंत आम्ही सगळे मैदानावर एक होऊन खेळतो. ही आमची एकजूट महसूलला वेगळी बळकटी देते असेही त्यांनी स्पष्ट केले.

# एमपीएससी उत्तीर्ण ४९८ उमेदवारांना अखेर नियुक्ती

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगातर्फे राज्यसेवा परीक्षेतील गट-अ आणि गट-ब वर्गातील उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. यात गट-अ च्या २२९ तर गट-ब च्या २६९ नियुक्त्या असून अशा एकूण ४९८ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आल्या आहेत. शासन निर्णय शुक्रवारी जारी झाला असून मिळालेल्या सर्व उमेदवारांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केलं आहे.

एमपीएससी स्पर्धा परीक्षेतून या उमेदवारांची निवड झाली होती. मात्र, प्रशासकीय कारणास्तव त्यांच्या नियुक्त्या अडकून पडल्य होत्या. अखेर, या ४९८ उमेदवारांच्या नियुक्तीचा आदेश पारीत झाल्याने वेटींगवर असलेल्या भावी अधिकाऱ्यांना पदभार स्वीकारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. लवकरच संबंधित निवड झालेले उमेदवार आपला पदभार स्वीकारतील, त्यामुळे पात्र निवड झालेल्या उमेदवारांना आनंद झाला आहे. एपीएससी मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतून क्लास २ च्या पोस्टसाठी उमेदवारांच्या निवडी झाल्या आहेत. त्यामध्ये, उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, पोलिस उपअधीक्षक, सहाय्यक पोलिस आयुक्त, सहाय्यक राज्यकर आयुक्त, गट विकास अधिकारी, मुख्याधिकारी, शिक्षणाधिकारी, बालविकास अधिकारी, उपशिक्षणाधिकारी, कक्ष अधिकारी, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, सहाय्यक गट अधिकारी, सहाय्यक प्रकल्प अधिकारी आदींचा समावेश आहे. या पदांवर हे ४९८ उमेदवार लवकरच पदभार स्वीकारुन शासनाच्या सेवेत कार्यरत होतील.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने २५ ऑक्टोबर २०२४ च्या पत्रान्वये राज्यसेवा परीक्षा-२०२२ च्या अंतिम निकालानुसार गट-अ संवर्गात एकूण २४४ उमेदवारांची शिफारस केली आहे. सदर २४४ उमेदवार तसेच राज्यसेवा परीक्षा-२०२१ च्या निकालान्वये मुदतवाढ घेतलेला १ उमेदवार अशा एकूण २४५ उमेदवारांची कागदपत्र तपासणी दि.९ डिसेंबर २०२४ ते १२ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये यशदा, पुणे या प्रशिक्षण संस्थेमध्ये आयोजित करण्यात आली होती.

# रविवारी रंगणार भारत-पाकिस्तान महामुकाबला!

**मुंबई (प्रतिनिधी)–** २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीतील हाय व्होल्टेज सामना रविवार, दि. २३ फेब्रुवारी रोजी खेळला जाणार आहे. या दिवशी भारत आणि पाकिस्तान आमनेसामने असतील. हा सामना दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला जाईल. भारतीय वेळेनुसार दुपारी २.३० वाजल्यापासून तुम्ही भारत आणि पाकिस्तानमधील सामना पाहू शकता. या हाय व्होल्टेज सामन्याचा टॉस दुपारी २ वाजता होईल. २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये दोन्ही संघांचा हा दुसरा सामना असेल.

# केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दोन दिवस पुण्यात

**पुणे (प्रतिनिधी)–** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दोन दिवसीय पुणे दौऱ्यावर असून शुक्रवारी सायंकाळी ते पुण्यात पोहोचले. शुक्रवार आणि शनिवार असे दोन दिवस अमित शाह यांचा पुणे दौरा असून शुक्रवारी कोरेगाव पार्क येथील वेस्टिन हॉटेलमध्ये त्यांनी मुक्काम केला. आज सकाळी ११ वाजता अमित शाहांच्या उपस्थितीत पश्चिम गृह विभागाची बैठक होणार आहे. तसेच हडपसर येथील विठ्ठल तुपे सभागृहात दुपारी तीन वाजता जनता सहकारी बँकेच्या हीरक महोत्सवी वर्षाच्या समारोपाला देखील सहकारमंत्री म्हणून अमित शाह उपस्थित राहणार आहेत. गृहमंत्र्यांच्या या पुणे दौऱ्याच्या निमित्ताने पुणे शहरातील वाहतुकीत बदल करण्यात आल्याची माहिती पुणे वाहतूक पोलीस शाखेकडून देण्यात आली आहे.

# सहकाऱ्यांचे दोन लाख रुपये घेऊन पसार; फसवणुकीचा गुन्हा दाखल

## हॉटेल ग्रँड तुलसी येथील प्रकार



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या हॉटेल ग्रँड तुलसी येथील शेफ याने सहकारी कर्मचाऱ्यांचे जवळपास दोन लाख रूपये घेऊन पसार झाल्याची घटना घडली. या प्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहराच्या हॉटेल ग्रँड तुलसी येथे शेफ म्हणून कार्यरत असलेला कुशल पाल याने याच हॉटेलमध्ये कार्यरत असलेल्या कामगारांचे मिळालेले वेतन बँकेत टाकण्यासाठी जमा करत होता. यापुर्वी एक, महिने त्याने कर्मचाऱ्यांचे पैसे बँकेत जमा केले होते. परंतु १८ फेब्रुवारी रोजी त्याच्याकडे जवळपास १२ कामगारांनी दिलेले १ लाख ९३ हजार ५०० रुपये बँकेत जमा करण्यासाठी दिलेले पैसे घेऊन तो पसार झाला. या प्रकरणी जीवन ज्योती प्रसन्नकुमार जेना रा. करीमनगर रोड, जि. रंगारेड्डी तेलंगणा, ह.मु. हॉटेल ग्रँड तुलसी यांच्या फिर्यादीवरून विमानतळ पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रदीप साखरे करत आहेत.

# मंत्र्यांवर आरोप झाल्यास पहिले त्यांनी राजीनामा दिला पाहिजे –अण्णा हजारे



**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** आरोप असतील तर नैतिकतेच्या मुद्यावरून मंत्र्यांनी राजीनामा द्यावा, असे म्हणत नाव न घेता अण्णा हजारेंचा मुंडे आणि कोकाटेंवर प्रहार केला आहे. तर अशांना मंत्रिमंडळात घ्यायचंच नव्हतं असाही टोला लगावलं. आरोप झाले तर जबाबदारी म्हणून पहिले आपण राजीनामा दिला पाहिजे असं वक्तव्य ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केलं आहे.

माणिकराव कोकाटे यांना देखील न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावली आहे. तसेच मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर अनेक आरोप होत असून त्यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. दरम्यान राज्यातील मंत्र्यांवर बोलताना अण्णा हजारेंनी नाव न घेता कोकाटे आणि मुंडेवर एक प्रकारे प्रहार केल्याचे पाहायला मिळालं. मंत्रिमंडळात असलेल्या मंत्र्यांवर आरोप झाल्यास जबाबदारी म्हणून पहिले त्यांनी राजीनामा दिला पाहिजे त्याने स्वतःचीचं इमेज वाढते. कारण जनता हे आपल्याला बघून अनुकरण करत असते. तुम्हीचं जर वाट सोडून चालला तर जनता कुठे जाणार, असेही अण्णा हजार म्हणाले.

अण्णा हजारे पुढे म्हणाले, अशा लोकांना मंत्रिमंडळात घेण्याआधी विचार करणे गरजेचे आहे. त्यांचं नेहमी आचार विचार शुद्ध असले पाहिजे. सुरवातीला हे चुकते आणि नंतर अशा घटना घडतात. त्यामुळे राज्याचे, समाजाचे देशाचं नुकसान होत याचं विचार करणं गरजेच आहे.

दिल्लीमध्ये एका बहिणीने मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. महिला मुख्यमंत्री होतात ही स्वाभिमानाची गोष्ट आहे, अशी उदाहरणं फार कमी होतात. विशेषतः आचार विचार शुद्ध असल्याने त्यांना जनतेने निवडून दिलं. पहिला मुख्यमंत्री होता आपचा तो निवडून आला मी काहीही बोललो नाही, मात्र हळूहळू त्याने दारूचे दुकान काढले लायसन्स दिले त्याने समाजासमोर आदर्श ठेवला पाहिजे होता. मात्र वाट सोडून चालल्याने जनतेने धडा शिकवला असल्याची टीका करत नव्याने मुख्यमंत्री झालेल्या रेखा गुप्ता यांना अण्णांनी शुभेच्छा दिल्या आहे.

# भारतीय वंशाचे काश पटेल एफबीआयचे नवे संचालक



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारतीय वंशाचे काश पटेल यांच्या अमेरिकेतील फेडरल ब्युरो ऑफ इनव्हेस्टिगेशन म्हणजे एफबीआय या गुप्तचर संस्थेच्या संचालक पदावरील नियुक्तीला अमेरिकन सिनेटने मंजूरी दिली आहे.

काश पटेल हे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात. सिनेटमध्ये झालेल्या मतदानादरम्यान काश पटेल यांना एफबीआयचे पुढील संचालक नियुक्त करण्याच्या बाजूने ५१ मते तर विरोधात ४९ मते पडली. रिपब्लिकन पक्षाच्या सुसान कॉलिन्स आणि लिसा मक्रोव्स्की यांनी देखील डेमोक्रॅटीक पक्षाच्याबरोबर पटेल यांच्या नियुक्तीच्या विरोधात मत दिले.

डोनाल्ड ट्रम्प यांनी अध्यक्ष पदाची निवडणुकी जिंकल्यानंतर लगेत पटेल यांच्याकडे एफबीआयची जबाबदारी सोपवली जाईल अशी घोषणा केली होती, आता यावर सिनेटने देखील शिक्कामोर्तब केले आहे. काश पटेल यांचे भारतातील गुजरातशी संबंध राहिले आहेत. पटेल यांनी यापूर्वा डिफेंडर आणि न्याय विभागात दहशतवाद विरोधी अभियोक्ता म्हणून काम केले आहे.

एफबीआय संचालक म्हणून काश पटेल यांचा कार्यकाळ हा १० वर्षांचा असेल. ट्रम्प यांनी अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारण्यापूर्वी क्रिस्टोफर रे यांनी राजीनामा दिला होता. आता त्यांची जागा काश पटेल यांनी घेतली आहे. काश पटेल यांचे भारताशी खास नाते राहिले आहे. त्यांचे आई-वडील हे गुजरातहून न्यूयॉर्कच्या गार्डनर सिटी येथे स्थायिक झाले होते. दोघे आधी कॅनडा येथे राहिले नंतर १९७० मध्ये अमेरिकेत गेले.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# समतोल साधणे आवश्यक

आपल्या देशाचे आणि राज्याचे शासन हे लोकप्रतिनिधी चालवत नसून प्रशासकीय यंत्रणा चालवतात, याचा प्रत्यय वारंवार येत असतो. तसाच एक प्रत्यय आत्ताच केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन वेतन आयोग जाहीर करण्याच्या निर्णयावरून आला आहे. पुन्हा वारेमाप आणि अनिर्बंध पगार देऊन शेतकऱ्यांना मात्र त्यांच्याच वाईट अवस्थेमध्ये कायमचे ठेवण्याची योजना शासन आखीत असते. भारतीय प्रशासन यंत्रणेतील वेतन आयोग हे सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतन, निवृत्तीवेतन आणि इतर लाभांचे पुनरावलोकन करणारे महत्त्वाचे धोरणात्मक घटक आहेत. यामुळे केवळ सरकारी कर्मचाऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा होते असे नाही, तर देशाच्या अर्थव्यवस्थेवरही मोठा प्रभाव पडतो, असा युक्तिवाद वारंवार केला जातो, पण हे अर्धसत्य आहे. सातव्या वेतन आयोगाच्या शिफारसींचा आर्थिक परिणाम अद्यापही जाणवत असताना, आठव्या वेतन आयोगाच्या चर्चेला जोर आला आहे. या नव्या आयोगाच्या शिफारसींमुळे सरकारी यंत्रणा, अर्थव्यवस्था आणि खाजगी क्षेत्रावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. आठव्या वेतन आयोगाच्या शिफारसींमुळे सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार, निवृत्तीवेतन आणि इतर लाभांमध्ये लक्षणीय वाढ होण्याची शक्यता आहे. सातव्या वेतन आयोगामुळे केंद्र सरकारला जवळपास १.०२ लाख कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च करावा लागला होता. यावेळी हा आकडा २० ते ३० टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. अशा मोठ्या आर्थिक भारामुळे केंद्र व राज्य सरकारांच्या वित्तीय व्यवस्थापनावर ताण येईल. केंद्राने पगार वाढवली की त्याचाच कित्ता राज्यांना गिरवावा लागतो. राज्य सरकारांच्या बाबतीत हा ताण आणखी गंभीर ठरतो, कारण त्यांच्या वार्षिक बजेटच्या ३० ते ४० टक्के निधी फक्त वेतन व निवृत्तीवेतनावर खर्च होतो. या परिस्थितीत निधी उभारण्यासाठी सरकारला विविध उपायांचा अवलंब करावा लागेल. आठव्या वेतन आयोगाच्या शिफारसींना लागू करण्यासाठी सरकारला निधी गोळा करावा लागेल. कर्मचाऱ्यांना द्यावा लागणारा वाढीव भत्ता आणि पगार हा शासन स्वतःच्या खिशातून कधीच करणार नाही. यासाठी आयकर व अप्रत्यक्ष करांमध्ये वाढ केली जाणार हे नक्की. उच्च उत्पन्न गटांवरील कर दर वाढवणे, कर वसुली प्रक्रियेतील सुधारणा यावर भर दिला जाऊ शकतो. तसेच वस्तू व सेवा कर अंतर्गत अधिक वस्तू व सेवांचा समावेश करून महसूल वाढवण्याचा प्रयत्न होऊ शकतो. याशिवाय सरकारी मालमत्ता आणि उपक्रम विक्री हा एक पर्याय असतो. मात्र, हा उपाय तात्पुरता ठरतो. मालमत्ता एकदाच विकली जाऊ शकते, त्यामुळे दीर्घकालीन निधी व्यवस्थापनासाठी हा पर्याय अपुरा ठरतो. राज्य सरकारांना त्यांच्या कर्मचाऱ्यांचे वेतन वाढवण्यासाठी स्वतंत्र तरतूद करावी लागेल. यामुळे राज्यांच्या महसूल संकलनावर ताण येईल. स्थानिक कर व इतर महसूल स्रोतांचा अधिकाधिक वापर करून राज्यांना त्यांचे वित्तीय गणित सांभाळावे लागेल. तसेच अनावश्यक खर्च कमी करणे, सवलतींचे विवेकी वाटप करणे आणि नवीन महसूल स्रोत शोधणे या बाबतीत राज्य सरकारांनी अधिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. सरकारी वेतनवाढीनंतर खासगी क्षेत्रावरही दबाव निर्माण होतो. उच्च कौशल्य असलेल्या कर्मचाऱ्यांना टिकवण्यासाठी खाजगी कंपन्यांना पगार वाढवावा लागतो, ज्यामुळे त्यांच्यावर आर्थिक ताण येतो. लघु व मध्यम उद्योगांसाठी हा ताण अधिक गंभीर ठरतो. याचा परिणाम म्हणून रोजगार निर्मितीवर मर्यादा येऊ शकते. तसेच सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारवाढीमुळे बाजारात मागणी वाढते. घरगुती वस्तू, वाहने, इलेक्ट्रॉनिक्स आणि सेवा क्षेत्रांमध्ये वाढलेली मागणी उत्पादनांच्या किमती वाढवू शकते. परिणामी, महागाई वाढण्याचा धोका संभवतो. या महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी पुरवठा साखळी सुधारणे हा महत्त्वाचा उपाय ठरतो. यासाठी सरकारने पायाभूत सुविधा, कृषी क्षेत्र आणि उत्पादन क्षेत्रांमध्ये गुंतवणूक वाढवावी. अनावश्यक खर्च टाळून फक्त उत्पादक क्षेत्रांमध्ये निधी वापरणे गरजेचे आहे. व्याजदरांमध्ये योग्य समायोजन करून मागणीला मर्यादा घालणे हा उपाय उपयुक्त ठरतो. तसेच, सवलती व अनुदाने विवेकी पद्धतीने वाटप केल्यास आर्थिक स्थैर्य राखता येईल. यामुळे महागाई नियंत्रणात ठेवून अर्थव्यवस्थेचा विकास साधता येईल. आठव्या वेतन आयोगाच्या शिफारसींमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर मोठा प्रभाव पडेल. वेतनवाढीमुळे सरकारी कर्मचाऱ्यांचा जीवनमानाचा स्तर उंचावेल. मात्र, यामुळे निर्माण होणाऱ्या वित्तीय तुटीचा सामना कसा करायचा, हे मोठे आव्हान असेल. सरकारने हा आर्थिक भार सांभाळण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना आखणे गरजेचे आहे. खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन देऊन रोजगार निर्मिती वाढवणे, नवीन कर संकलन प्रणाली विकसित करणे आणि खर्च व्यवस्थापन सुधारणे या बाबी महत्त्वाच्या ठरतील. आठवा वेतन आयोग हा भारतीय अर्थव्यवस्थेसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. यामुळे सरकारी यंत्रणेचा कार्यक्षमतेवर सकारात्मक परिणाम होईल. मात्र, आर्थिक तुटीचे व्यवस्थापन, महागाई नियंत्रण आणि खाजगी क्षेत्राला आधार देणे या बाबतीत सरकारला ताळमेळ साधावा लागेल. या आयोगामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांना संधीमध्ये बदलण्यासाठी ठोस आणि दीर्घकालीन धोरणे आवश्यक आहेत. कारण भारतीय अर्थव्यवस्थेच्या स्थैर्य व विकासासाठी हा समतोल राखणे काळाची गरज आहे.

# महान स्वातंत्र्य सेनानी राणी चेन्नमा

इंग्रजांनी आपल्या देशावर सुमारे पावणे दोनशे वर्ष राज्य केले. या पावणे दोनशे वर्षांत त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय अत्याचार केले. इंग्रजांच्या याच अन्याय अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात अज्ञात देशभक्त बांधवांनी लढा दिला त्यात काही महिलाही होत्या हे मात्र अतिशय कमी लोकांना माहीत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महिलांची यादी जर काढली तर अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या महिलांची नावे आपल्याला आठवतील कारण बऱ्याच महिला स्वातंत्र्य सैनिकांची म्हणा किंवा देशासाठी त्याग करणाऱ्या देशभक्त महिलांची म्हणा आपल्या इतिहासकारांनी नोंदच घेतली नाही त्यामुळे त्यांचा इतिहास नवीन पिढीच्या समोर आलाच नाही. अशाच एका देशभक्त महिला स्वातंत्र्य सेनानीच्या शौर्याची माहिती आज आपण या लेखातून घेऊ कारण आज त्या महान महिला स्वातंत्र्य सेनानीची काल म्हणजे २१ फेब्रुवारी रोजी पुण्यतिथी होती. त्या महान स्वातंत्र्य सेनानीचे नाव आहे कित्तुरची राणी चेनम्मा.



२३ ऑक्टोबर १७७८ रोजी बेळगाव येथील काकटी या छोट्या गावात राणी चेन्नमा यांचा जन्म झाला. लहानणापासूनच धाडसी असलेल्या राणी चेन्नमा यांना त्यांचे वडील धुळाप्पा देसाई गौड्रारू यांनी घोडेस्वारी करणे, तलवार चालवणे, भाला फेकणे याचे शिक्षण दिले. वयाच्या पंधराव्या वर्षी राणी चेन्नमा यांचा विवाह देसाई कुटुंबातील राजा मल्लसराज यांच्याशी झाला. मात्र १८२४ हे वर्ष त्यांच्यासाठी दुर्भग्याचे वर्ष ठरले कारण याच वर्षी त्यांच्या पतीचे आणि मुलाचेही निधन झाले. एकाच वर्षी पती आणि मुलगा सोडून गेल्याने त्यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. राजा मल्लसराज यांच्या निधनाने त्यांच्या राज्यात अस्थैर्य माजले याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी त्यांच्या राज्यावर आक्रमण करण्याचे ठरवले. इंग्रजांकडून राज्य वाचवण्याची फार मोठी जबादारी राणी चेन्नमा यांच्यावर येऊन पडली मात्र त्या डगमगल्या नाहीत. त्यांनी तात्काळ आपली राजधानी डोंगर भागात हलवली. राजगादीला वारस असावा म्हणून त्यांनी शिवलिंगप्पा नावाचा पुत्र दत्तक घेतला व त्याला राज्याचा उत्तराधिकारी बनवले मात्र तत्कालीन ब्रिटिश अधिकारी लॉर्ड डलहौसी याने दत्तक विधान नाकारत शिवलिंगप्पा याची राज्याचा वारसदार म्हणून हाकलपट्टी करण्याचा आदेश दिला. जर एखाद्या राज्याचा राजा निधन पावला आणि त्याला वारस नसेल तर दत्तक असलेला पुत्र राज्याचा वारस होऊ शकत नाही त्यामुळे ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला होता त्यामुळे कोणत्याही परीस्थितीत आपले राज्य इंग्रजांच्या ताब्यात जाऊ द्यायचे नाही असा निर्धारच राणी चेन्नमा यांनी केला होता.

कित्तुरचे राज्य हे धारवाड जिल्ह्यात येत होते. सेंट जॉन थाच्रेय हा त्यावेळी धारवाडचा गव्हर्नर होता तर चॅप्लिन हा कमिशनर होता. या दोघांनीही राणी चेन्नमा यांना राज्य खालसा करण्याची सूचना केली आणि तसे न केल्यास युद्धास तयार राहण्यास सांगितले. राणी चेन्नमा यांनी शेवटचा पर्याय म्हणून बॉम्बे प्रेसिडेंटचे लेफ्टनंट गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना राज्य खालसा न करण्याबाबत विनंती अर्ज केला मात्र त्यांनी तो धुडकावून लावत कितुरवर हल्ला चढवला. इंग्रजांनी कित्तुरवर हल्ला चढवला आणि कित्तुरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. कित्तुरच्या खजिन्यात त्यावेळी मौल्यवान दागदागिने आणि दीड कोट रुपये इतका खजिना होता. इंग्रजांच्या मद्रास नेटीव्ह हॉर्स अर्टेलरीच्या तिसऱ्या तुकडीत २० हजारांपेक्षा अधिक सैनिक होते त्यात सुमारे ४०० पेक्षा अधिक सैनिक हे बंदूकधारी होते मात्र राणी चेन्नमा यांचे सैन्यही कमी नव्हते त्यांनी इंग्रज सैन्या विरुद्ध निकराचा लढा दिला आणि इंग्रज सैन्याचा धुव्वा उडवला. राणी चेन्नमा यांचे सैन्य आपल्याशी अशाप्रकारे धैर्याने मुकाबला करतील अशी अपेक्षा इंग्रजांना नव्हती त्यांनी राणी चेन्नमाच्या सैन्याला हलक्यात घेतले.

राणी चेन्नमाचे सैन्याचे बळ इंग्रजांच्या तुलनेत अल्प होते मात्र राणी चेन्नमा यांनी आपल्या सैनिकांमध्ये स्फुर्ती निर्माण केली. आपली राणी महिला असूनही इंग्रजांशी निकराने लढते हे पाहून त्यांनाही स्फुरण चढले आणि त्यांनी इंग्रज सैन्याचा पराभव केला. या युद्धात सेंट जॉन हा गव्हर्नर मारला गेला. इंग्रजांच्या काही अधिकाऱ्यांना राणी चेन्नमा यांच्या सैनिकांनी बंदी बनवले. युद्ध बंदी करण्याच्या अटीवरच या अधियाऱ्यांची सुटका करण्यात आली. युद्ध बंदीचा करार करूनही इंग्रज अधिकाऱ्यांनी तो पाळला नाही. कमिशनर चॅप्लिन याने मोठ्या ताकदीनिशी कुत्तुरवर पुन्हा हल्ला केला. यावेळीही राणी चेन्नमाच्या सैन्याने निकराने लढा दिला मात्र बैलहोगल किल्लयात राणी चेन्नमा पकडल्या गेल्या आणि त्यांना कैदेत टाकण्यात आले. २१ फेब्रुवारी १८२९ रोजी इंग्रजांच्या कैदेतच राणी चेन्नमा यांचे निधन झाले. राणी चेन्नमा यांच्या निधनानंतरही राणीचे सैन्य इंग्रजांशी लढत राहिले मात्र तो लढा अपयशी ठरला. मात्र राणी चेन्नमा यांचे शौर्य पाहून इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांना सलाम केला. राणी चेन्नमा यांचे शौर्य इतिहासाच्या पानावरील एक स्फुर्तिदायक अध्याय आहे मात्र आजही हा इतिहास तरुण पिढीपासून दूर आहे म्हणूनच हा लेख प्रपंच. भारतीय इतिहासातील एक सुवर्ण अध्याय म्हणून राणी चेन्नमा यांच्या लढ्याकडे पाहायला हवे. पुण्यतिथीनिमित्त राणी चेन्नमा यांना विनम्र अभिवादन!

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# छावा: सर्वांनी अवश्य पाहावा असा चित्रपट




भारताचा इतिहास अतिशय जाज्वल्य असा आहे. परंतु आपणाला मुघलांचा इतिहास, औरंगजेबाचा इतिहास, परकीय राज्यकर्त्यांचा इतिहासच शिकवला जातो. आपल्या देशात अनेक शूरवीर महान योद्धे होऊन गेले. परंतु अगदी थोडक्यात दोन चार पानांमध्ये आपणाला त्यांचा इतिहास शिकवला जातो.

नुकताच लक्ष्मण रामचंद्र उतेकर दिग्दर्शित 'छावा' हा चित्रपट प्रदर्शित झालेला आहे. हा चित्रपट सर्व भारतामध्ये प्रचंड धुमाकूळ गाजवत आहे. छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचे चिरंजीव छत्रपती संभाजीराजे भोसले यांच्या जीवन कार्यावर आधारित हा चित्रपट म्हणजे भारतीयांचा लपवण्यात आलेल्या अलौकिक अशा इतिहासाची महागाथा होय. विकी कौशल या अतिशय श्रेष्ठ अभिनेत्याने या चित्रपटात छत्रपती संभाजी राजांची भूमिका केलेली आहे. हा चित्रपट पाहताना आपणाला साक्षात संभाजी महाराज पडद्यावर आहेत असा भास होतो. विकी कौशलची पिळदार शरीरयष्टी, डोळ्यातील भेदक नजर,चेहऱ्यावरील करारी भाव व स्वाभिमान छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेला अतिशय योग्य न्याय देतात. यापुढे जेव्हा जेव्हा संभाजी महाराजांचं नाव निघेल तेव्हा तेव्हा डोळ्यासमोर फक्त विकी कौशल यांनीच संभाजी महाराज यांच साकारलेलं व्यक्तिमत्व दिसेल. दुसरीकडे संभाजी महाराजांची पत्नी येसूबाईचा रोल करणारी दक्षिणात्य अभिनेत्री रश्मिका मंदाना हिचे जेवढे कौतुक करावे तेवढे कमी आहे. रश्मिकाच्या चेहऱ्यावरील अतिशय निरागस भाव, प्रेमळ नजर, रुबाबदारपणा येसूबाईच्या भूमिकेला अतिशय योग्य न्याय देते. नऊवारी साडी परिधान करून मोठ मोठ्या टपोऱ्या डोळ्यासह व महाराष्ट्रीयन दागिण्यासह रश्मिका आपणाला इतिहास काळात घेऊन जाते. एकदम मराठमोळी दिसणारी रश्मिका म्हणजे शंभू महाराजांची मनाला भावणारी श्री सखी आपल्या डोळ्याची पारण फेडते.

मुगल बादशहा औरंगजेबाची भूमिका करणाऱ्या अक्षय खन्ना यांनी या चित्रपटात केलेली भूमिका ही बहुदा अक्षय खन्नाच्या जीवनातील सर्वात सुंदर भूमिका ठरणारी आहे. अतिशय कमी शब्दांमध्ये फक्त डोळ्याचे, चेहऱ्याचे हावभावाने अक्षय खन्नाने अतिशय जबरदस्त भूमिका पार पाडली आहे.

शिवाजी सावंत यांच्या 'छावा' या कादंबरीवर आधारित हा चित्रपट प्रदर्शित करण्यात आलेला आहे. बुऱ्हानपूरच्या युद्धापासून या चित्रपटाची सुरुवात होते. छत्रपती संभाजी महाराजांचे सिंहासोबत दाखवलेले युद्ध आपल्या शरीरावर अक्षरशः शहारे निर्माण करते व डोळ्याचे पारणे फेडते. चित्रपटातील प्रत्येक क्षण हा अतिशय जिवंत करण्यात आलेला आहे. चित्रपटातील युद्ध दृश्य अवर्णनीय आहेत. चित्रपट पाहताना एक क्षणभरही नजर हटत नाही. छत्रपती संभाजी महाराजांचा राज्याभिषेक दाखवताना चित्रित करण्यात आलेला प्रसंग, त्या काळातील मावळ्यांची वेशभूषा अतिशय हुबेहूब दाखवण्यात आलेली आहे.

छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या ३२ वर्षाच्या आयुष्यात १२० लढाया लढल्या असून त्या सर्वच्या सर्व जिंकलेल्या आहेत. छत्रपती संभाजी महाराज हे भारतीय इतिहासातील एकमेव अपराजित योद्धा होते. ते अतिशय पराक्रमी होते. तेरा भाषांचे ज्ञान असलेल्या छत्रपती संभाजी राजांना शस्त्राबरोबरच शास्त्राचेही अद्भुत असे ज्ञान होते. छत्रपती संभाजी महाराजांनी संस्कृत मध्ये बुधभूषण, नखशिखा व नाईकाभेद हे तीन ग्रंथ लिहिलेले आहेत. चित्रपटात संभाजी महाराजांचे संस्कृत व इंग्रजी भाषेतील संभाषण श्रवणीय आहे. परंतु समाजातील काही इतिहासकारांनी मुद्दामहून संभाजी महाराजांचे कर्तृत्व, त्यांचे शौर्य, त्यांचे ज्ञान दाबण्याचा प्रयत्न केलेला दिसतो व त्यांची चुकीची प्रतिमा रंगवली होती.

आठ लाख सैन्यासह लढणाऱ्या औरंगजेबाला फक्त २०००० सैन्यासह लढणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांनी नऊ वर्ष सळो की पळो करून सोडलेल होत. जन्मापासूनच छत्रपती संभाजी महाराजांना अनेक अवघड प्रसन्नांना तोंड द्यावे लागले. अगदी लहानपणीच स्वतःची आई सईबाई यांच निधन झाल्यानंतर राजमाता जिजाऊ माँ साहेबांनी संभाजी महाराजांना छत्रपती शिवाजी महाराज सारखेच अध्यात्मिक व सर्व क्षेत्रातील ज्ञान दिले.

चित्रपट पाहताना आपणाला लक्षात येते की, स्वकीयांनी दिलेला धोका व त्यातून झालेला घात यामुळे छत्रपती संभाजी महाराज औरंगजेबाच्या तावडीत सापडले. छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य पाहून औरंगजेबाने संभाजी महाराजांना तीन अटी ठेवल्या होत्या. त्या बदल्यात ते त्यांना राजा बनवणार होते. त्यामध्ये पहिली अट होती की तुम्ही मुस्लिम धर्म स्वीकारावा, दुसरी अट होती सर्व लुटलेल सोन, खजिना वापस करावा व तिसरी अट होती स्वराज्यातील पूर्ण किल्ले औरंगजेबाच्या स्वाधीन करावेत. परंतु अतिशय स्वाभिमानी असलेल्या संभाजी महाराजांनी यातील कुठलीही अट मानली नाही.

चित्रपटात त्या औरंग्याने संभाजी महाराजांना दिलेल्या नरक यातना, अमानुष अत्याचार पाहताना आपण अतिशय अस्वस्थ होतो. डोळ्यात अश्रू येतात.महाराजांच्या संपूर्ण शरीरावर झालेल्या जखमेवर मीठ लावून त्यांचे केलेल हाल व अतिशय निर्दयतेने काढण्यात आली त्यांची नखे हा प्रसंग पाहताना आपण डोळे बंद करतो.अतिशय क्रूरतेने कापण्यात आलेली बोटे व नंतर मग आगीतून काढलेल्या तप्त सळीने महाराजांची काढलेली डोळे मनात धडकी भरवतात. शेवटी महाराजांची जीभ सुद्धा कापण्यात येते,तरीही किंचितही न डगमगता या मर्द मराठ्याने आपला स्वाभिमान, आपला हिंदू धर्म सोडला नाही व अशा प्रकारे अतिशय क्रूरतेने संभाजी महाराजांना ४० दिवसानंतर मरण पत्करावे लागले.

छावा चित्रपटातील सर्वच कलाकारांचा अतिशय उत्तम संवाद, चित्रपटातील सर्वच कलाकारांनी केलेला अतिशय उत्तम अभिनय चित्रपटाला वेगळ्या उंचीवर नेतात. चित्रपटात कुठेही अतिशयोक्ती दाखवण्यात आलेली नाही. वेळेअभावी अनेक महत्त्वाचे प्रसंग चित्रपटात दाखवायचे राहून गेले आहेत. ए आर रहमान चे संगीत चित्रपटाला न्याय देऊ शकले नाही.शंभूराजांचे मित्र कवी कलश यांच्या भूमिकेत विनीत कुमार सिंग व हंबीरमामा यांच्या भूमिकेत एक मुरब्बी अभिनेता आशुतोष राणा त्याच बरोबर इतर सर्व मावळ्यांची केलेली भूमिका चित्रपटाला परिपूर्ण बनवतात.

'छावा' चित्रपटाचा शेवट पहाताना आपल्या हाताच्या मुठी आपोआप आवळल्या जातात. अंगामध्ये प्रचंड राग निर्माण होतो.डोळे भरून येतात व खरोखर आपल्यासमोरच हा प्रसंग होत आहे असा भास होतो. इतर चित्रपटापेक्षा नेमका इथेच वेगळेपणा दाखवणारा हा चित्रपट होय. भारतीय चित्रपटाच्या इतिहासातील इतिहासाला ज्वलंतरूप देणारा व सत्य दाखवणारा हा चित्रपट नवीन पिढीसाठी आपला इतिहास दाखवण्यासाठी अतिशय मार्गदर्शक आहे. चित्रपटात कवी कलश यांची एक कविता, हाथी, घोडे, तोफ, तलवारे, फौज तेरी सारी है! पर जंजीरो मे जकडा मेरा राजा, आज भी सब पे भारी है! ही आपल्या लाडक्या शंभूराजा बद्दलची त्यांची निष्ठा व विश्वास दर्शवतात. त्याचबरोबर छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर औरंगजेबाच्या मुलीच्या मनातील दाखवलेले वाक्य, वो अपने मौत का जश्न मना के चला गया और हमे अपनी जिंदगी का मातम मनाने के लिए छोड गया ! हे औरंगजेबाच्या मनातील पराभव दाखवते. चित्रपट संपल्यानंतर प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू येतात व सर्वजण स्तब्ध होतात.

'छावा' हा चित्रपट छत्रपती संभाजी महाराजांची हिंदवी स्वराज्याच्या रक्षणासाठी दिलेली बलिदानाची शौर्यगाथा दाखवणारा चित्रपट आहे. 'छावा 'हा फक्त चित्रपट नाही तर इतिहासाची धगधगती पेटलेली आग आहे. 'छावा ' चित्रपट म्हणजे तरुण पिढीसाठी एक प्रेरणा आहे. प्रत्येकाने सहकुटुंब हा चित्रपट चित्रपटगृहातच पहावा असा हा चित्रपट आहे.

**–डॉ. विजय भोसले,**
यशवंत महाविद्यालय, नांदेड.
मो.९४०३०६७२५२

# सकारात्मक विचार करुन परीक्षा द्या!

फेब्रुवारी मार्च महिना म्हटलं की परीक्षांचा हंगाम. दरवर्षी याच दोन महिन्यात परीक्षा होतात. दहावी बारावी या बोर्डाच्या परीक्षाही याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय यासारख्या स्पर्धा परीक्षाही याच काळात होतात. इयत्ता ५ वि आणि ८ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षा नुकत्याच पार पडल्या.



बारावीची परीक्षाही उद्यापासून म्हणजे २१ फेब्रुवारीपासून सुरू होणार असून दहावीची परीक्षा १ मार्च ते २६ मार्च दरम्यान आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतो. विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात म्हणूनच या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनात अतिशय महत्वाच्या असतात. दहावी बारावीची बोर्ड परीक्षा म्हणजे विद्यार्थी आणि पालकांसाठी कमालीचे टेन्शन.

करियरच्या दृष्टीने आणि पुढील अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी बोर्ड परीक्षेच्या गुणांना खूप महत्व असते. त्यामुळे विद्यार्थी वर्षभर भरपूर अभ्यास करत असतात. पण प्रत्यक्ष जेंव्हा परीक्षा जवळ येते तेंव्हा मात्र विद्यार्थ्यांचे टेन्शन वाढते. ते साहजिकच असले तरी या काळात विद्यार्थ्यांनी टेन्शन फ्री राहणे महत्वाचे आहे कारण नकारात्मक विचार घेऊन जर विद्यार्थी परीक्षेला गेला तर त्याचा विपरीत परिणाम होऊन वर्षभर केलेल्या मेहनतीवर पाणी पडू शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत प्रसन्न रहावे.

सतत अभ्यास करण्याऐवजी मध्येमध्ये ब्रेक घेऊन थोडा वेळ टीव्ही पाहणे, संगीत ऐकणे, लहान मुलांशी खेळणे, बाहेर फिरून येणे, मित्रांशी अभ्यासाव्यतिरिक्त इतरही विषयांशी चर्चा करणे, गप्पा मारणे, चित्र काढणे, आवडती पुस्तके वाचणे अशा गोष्टी कराव्यात. रात्री जागरण करणे टाळावे. विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत मोबाईलपासून दूरच राहावे. वेळेवर झोपून वेळेवर उठावे. अभ्यासाचा खूप ताण आल्यास विश्रांती घ्यावी. या काळात शक्यतो बाहेर खाणे टाळावे. घरी बनवलेले जेवण वेळेवर करावे.

पालकांनीही याकाळात सकारात्मक राहावे. आपल्या पाल्यांवर अभ्यासासाठी दबाव आणू नये. त्याला सतत परीक्षेची आठवण करून देऊ नये. त्याच्याशी हसून खेळून प्रेमाणे वागावे. पालकांनी स्वतःही परीक्षेचे टेन्शन घेऊ नये आणि मुलांनाही देऊ नये. जर विद्यार्थी परिक्षेचे टेन्शन न घेता सकारात्मक विचार घेऊन परीक्षेला गेला तर यश निश्चित मिळेल. दहावी बारावीच्या परीक्षा आयुष्यातील महत्वाचा टप्पा असला तरी शेवटचा टप्पा नाही त्यामुळे टेन्शन फ्री राहा. मन शांत ठेवून प्रश्नपत्रिका सोडवा. यश नक्की मिळेल. सर्व विद्यार्थी मित्रांना या बोर्ड परीक्षांसाठी मनापासून शुभेच्छा! ऑल दि बेस्ट.....!!

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# महाराष्ट्र शासनाचे १४ वर्षे मुदतीचे १,००० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या १४ वर्षे मुदतीच्या १,००० कोटींच्या रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकासकामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल.

२५ फेब्रुवारी, २०२५ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् २५ फेब्रुवारी, २०२५ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टिमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान २७ फेब्रुवारी, २०२५ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

# रविराज गायकवाडने पटकावली मराठा केसरी गदा

**पुणे :** तब्बल ३० मिनिटांच्या रोमहर्षक झटापटीनंतर पेहलवान रविराज गायकवाडने कालीचरण सोलकरला चितपट करून मराठा केसरीची गदा आपल्या नावे केली. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्ताने सकल मराठा सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळाच्यावतीने ठाण्यात कुस्ती स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

छत्रपती शिवाजी महाराज मैदानात प्रमुख संयोजक रमेश आंब्रे, कार्याध्यक्ष कृष्णा पाटील, सचिव संतोष सूर्यराव, खजिनदार धनंजय समुद्रे यांच्या विशेष पुढाकाराने रंगलेल्या या कुस्ती स्पर्धेला कुस्तीशौकिनांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. स्पर्धेतील निर्णायक लढत रंगतदार ठरल्याने कुस्तीशौकिनांना कुस्तीचा चांगलाच आनंद लुटला.

रविराज आणि कालीचरण दोघेही तुल्यबळ असल्याने कुस्तीशौकिनांना अपेक्षित असा खेळ पहायला मिळाला. दोघांनीही एकापेक्षा एक डावपेच टाकत विजय मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. पण शेवटी रविराजने थकलेल्या कालीचरणला खाली खेचत चितपट करत मराठा केसरी गदेवर आपले नाव कोरत रोख बक्षीस पटकावले. धीरज पवार आणि सकपाळ सोनटक्के यांच्यात दुसऱ्या क्रमांकाची कुस्ती रंगली. पण ऐन खेळात धिरजचा खांदा दुखावल्याने पंचांनी ही कुस्ती बरोबरीत सोडवली.

## थोडक्यात...

### शिवजयंतीनिमित्त सप्तरंग सेवाभावी संस्थेच्यावतीने अन्नवाटप

**नांदेड (प्रतिनिधी)–** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सप्तरंग सेवाभावी संस्थेच्यावतीने छत्रपती शिवाजी पुतळा परिसरात अन्नवाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमाचे मार्गदर्शन संस्थेच्या अध्यक्षा डॉ. सान्वी जठवानी यांनी केले होते.

या माध्यमातून समाजात समता आणि बंधुतेचा संदेश दिला गेला. विविध धर्म आणि जातीतील लोकांनी एकत्र येत हा उपक्रम यशस्वी केला. सप्तरंग सेवाभावी संस्था नेहमीच सामाजिक आणि उपयुक्त उपक्रम राबवत असते. संस्थेच्यावतीने करण्यात आलेल्या या स्तुत्य कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. या उपक्रमात दायम कुरेशी, हरीश काळे, प्रसाद श्रीनाथ, शुभम बोराटे, लखन वापराणी आणि साईनाथ वानशेट्टे यांनी परिश्रम घेतले.

### भारतीय दिव्यांग क्रिकेट संघात संजय चव्हाणची उत्कृष्ट कामगिरी

**नांदेड (प्रतिनिधी)–** युवा क्रिकेटपटू संजय चव्हाण याची भारताच्या दिव्यांग क्रिकेट संघात निवड झाली. प्रतिकुल परिस्थितीशी झुंज देत संजयने आपल्या मेहनतीच्या जोरावर राष्ट्रीय पातळीवर स्थान निर्माण केले आहे.

२०२२ मध्ये बांगलादेश येथे चांगली कामगिरी केल्याने संजयला भारतीय दिव्यांग क्रिकेट संघाकडून फलंदाजीसाठी सलामीला संधी मिळाली आणि संजयने २९ चेंडूमध्ये ४६ धावा करून आपल्या भारतीय दिव्यांग क्रिकेट संघांसाठी चांगली सुरवात करून दिली. भारतीय संघाने सामना जिंकत आपले कौशल्य दाखवले. संजयची निवड ही नांदेड जिल्ह्यासाठी अभिमानाचा क्षण असून, तो इतर दिव्यांग खेळाडूंना प्रेरणादायी ठरला आहे.

# स्त्री-पुरुष समानता काळाची गरज -आ. श्रीजया चव्हाण




**नांदेड (प्रतिनिधी)–** जगातील प्रत्येक क्षेत्रात आजची स्त्री पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे. तरी सुद्धा आपल्याकडे स्त्रियांना कमी लेखण्याची मानसिकता आहे. या मानसिकतेतून बाहेर पडणे आवश्यक आहे. स्त्री ही कुठेही पुरुषापेक्षा कमी नसल्यामुळे स्त्री-पुरुष समानता ही काळाची गरज आहे, असे मत भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आ. ॲड. श्रीजया चव्हाण यांनी व्यक्त केले.

त्या दि. २० फेब्रुवारी रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या आधीसभा सभागृहामध्ये 'महिला सशक्तिकरण आणि रोजगारांच्या संधी' विषयावर प्रमुख पाहुणे म्हणून व्याख्यान देत होत्या.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, कुलसचिव डॉ. डी.डी. पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य नरेंद्र चव्हाण, डॉ. सूर्यकांत जोगदंड, डॉ. हनमंत कंधारकर, प्रा. डॉ. संगीता माकोणे, आय. क्यू.एससी विभागाचे संचालक डॉ. बी.सुरेंद्रनाथ रेड्डी, स्त्री अध्ययन केंद्राच्या संचालिका डॉ. शालिनी कदम, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव यांची उपस्थिती होती.

पुढे आ. चव्हाण म्हणाल्या, आपल्या भागातील विद्यार्थ्यांनी घराच्या बाहेर पडले पाहिजे, त्यामुळे अनुभवातून शिकायला मिळते. जगाशी स्पर्धा करण्याचे बळ मिळते. व्यक्तिमत्व विकसित होते. आज आपल्या हातात मोबाईल आहे. त्याचा वापर चांगल्या गोष्टीसाठी करा. नुसत्या रिल्स बघून पोट भरणार नाही. व्यक्तिमत्व विकास साधण्यासाठी नव-नवीन कौशल्य अवगत करा. आपल्या आई-वडिलांचा, शिक्षकांचा, थोरा-मोठ्यांचा आदर करा. दिखाव्याच्या मागे धावू नका. वाचन वाढवा असेही त्या यावेळी म्हणाल्या.

दि. २२ फेब्रुवारी रोजी अर्धापूर येथे रोजगार मेळावा घेण्यात येत आहे. त्यामध्ये १३६ कंपन्या सहभाग घेणार आहेत. आपल्या विद्यार्थ्यांना नोकरी करण्याच्या दृष्टीने ही एक बहुमोलाची संधी आहे. ही संधी सर्वांसाठी खुली आहे. याचा लाभ प्रत्येक गरजू विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

अध्यक्षीय समारोपामध्ये विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर म्हणाले, हा भाग नैसर्गिकदृष्ट्या सुजलाम-सुफलाम आहे. पण विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वासाची कमतरता आहे. त्याचे कारण अपुरे वाचन व अपुरे कौशल्य आहे. येणाऱ्या काळात विद्यापीठ या दोन्हीही गोष्टीवर भर देऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी कटीबद्ध राहणार आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ. सूर्यप्रकाश जाधव यांनी केले या कार्यक्रमास प्रा. डॉ. घनश्याम येळणे, प्रा. डॉ. राजेश्वर डुडूकनाळे, प्रा. दिपाली जैन, प्रा. योगिनी सातारकर यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# २१ व्या मराठा वधू-वर परिचय पुस्तिकेचे विमोचन



**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठा वधू-वर सूचक मंडळ नांदेडच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या २१ व्या मराठा वधू-वर परिचय पुस्तिकेचे विमोचन रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीच्या औचित्याने नवा मोंढा येथे संपन्न झालेल्या सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळ्यात करण्यात आले.

सदर पुस्तिकेचे विमोचन महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विचार मंचावर नांदेड लोकसभेचे खा. प्रा. रविंद्र चव्हाण, कंधार-लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, माधवराव पाटील शेळगावकर, मारोतराव कवळे गुरुजी, जिजाऊ ब्रिगेडच्या माजी अध्यक्षा सौ. रेखाताई चव्हाण, माजी शिक्षण संचालक गोविंद नांदेडे, उद्धव पाटील सूर्यवंशी, ॲड. बालाजी वाघमारे, पंडित कदम, रमेश पवार, वधू-वर मंडळाचे संस्थापक कार्याध्यक्ष संभाजीराव पाटील शिंदे, मंडळाचे सचिव प्रा. संतोष देवराये, उपाध्यक्ष इंजि. तानाजी हुसेकर, सभासद शिवाजीराव खुडे आदींसह सामाजिक चळवळीतील बहुसंख्य पदाधिकारी उपस्थित होते.

मागील वीस वर्षांपासून मराठा वधू-वर सुचक मंडळ समाजातील नियोजित वधूवरांना योग्य व अनुरूप जोडीदार निवडता यावा यासाठी मोफत वधू-वर परिचय मेळावे आयोजित करीत असते. यावर्षीचा २१ वा मेळावा ७ जानेवारी रोजी हनुमान मंदिर मंगल कार्यालयात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्यात नोंदणी केलेल्या नियोजित वधू-वरांची परिचय पुस्तिका तयार करण्यात आली. या पुस्तिकेचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते शिव जन्मोत्सवाच्या सोहळ्यात झाले. सदर पुस्तिका ही नियोजित वधू-वरांसाठी मोठी उपलब्धी असल्याचे प्रतिपादन खा. अशोकराव चव्हाण यांनी केले. सदर पुस्तिका ज्यांना आवश्यक आहे त्यांच्यासाठी विजयनगर हनुमान मंदिर मंगल कार्यालयात उपलब्ध असेल असे मंडळाचे संस्थापक कार्याध्यक्ष संभाजीराव शिंदे, सचिव प्रा. संतोष देवराये, उपाध्यक्ष इंजि. तानाजीराव हुस्सेकर, दिगंबरराव कदम, ॲड. एल. जी. पुयड, शिवाजीराव खुडे, राजश्रीताई पाटील, कल्पनाताई डोंगळीकर यांनी कळविले आहे.

# खा. डॉ. गोपछडे यांच्या पुढाकारातून बायोगॅस व सहकारी दूध संस्था नोंदणी कार्यशाळेचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** पंडीत दीनदयाल उपाध्याय सेवा प्रतिष्ठान, नांदेडच्यावतीने पशुपालक शेतकऱ्यांसाठी बायोगॅस कार्यशाळा व सहकारी दुध संस्था नोंदणी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन राज्यसभा खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या पुढाकारातून दि. ६ मार्च २०२५ रोजी करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल ह्या राहणार आहेत. या प्रशिक्षणात तज्ञ मार्गदर्शक म्हणून कार्यकारी संचालक राष्ट्रीय डेरी विकास बोर्ड (मृदा) आनंद गुजरातचे संदीप भारती, विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध)च्या कल्पना शाह, दीनदयाल शोध संस्थान दिल्लीचे प्रा. उपेंद्र कुलकर्णी यांची उपस्थिती असणार आहे.

जिल्हा नियोजन भवन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे ही कार्यशाळा गुरुवार, दि. ६ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ ते सायं. ४ दरम्यान संपन्न होईल. नांदेड जिल्ह्यात गुजरात सारखे सहकारी दूगध संस्थांचे यशस्वी मॉडेल उभे रहावे हा संकल्प घेऊन सर्वांच्या सहकार्याने नांदेड जिल्ह्यात गोकुळ निर्माण करु अशी हाक राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी दिली आहे. यानुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांना निमंत्रण देऊन या कार्यशाळेच्या नियोजन संदर्भात चर्चा केली. जिल्हाधिकारी यांनी ही या कार्यशाळेसाठी आपण उपस्थित राहू असा विश्वास दिला आहे.

बायोगैस नोंदणीकृत पशुपालक शेतकरी आणि सहकारी दूध संस्थेचे प्रत्येकी दोन शेतकरी प्रतिनिधी यांना या कार्यशाळेत प्रशिक्षण दिले जाणार आहे. पुढील टप्प्यात हेच प्रशिक्षित शेतकरी इतरांना प्रेरणा देऊन या धवल क्रांतीचे अग्रदूत होतील अशी संकल्पना पंडीत दीनदयाल उपाध्याय सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष खा. डॉ. अजित गोपछडे यांनी व्यक्त केली.

# भारतीय सौंदर्यशास्त्र अधिक व्यापक करण्याची गरज -प्रा. चंचल चौहान

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारत हा व्यामिश्र संस्कृतींचा व भाषांचा देश आहे. भारतात अनेक धर्म, संस्कृती आणि भाषा आहेत, असा 'अथर्ववेद' या ग्रंथात उल्लेख आहे. ही बहुविधता जपत भारतीय सौंदर्यशास्त्र अधिक समावेशी करणे गरजेचे आहे, असे मत सुप्रसिद्ध विचारवंत डॉ. चंचल चौहान (नवी दिल्ली) यांनी व्यक्त केले.

ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या भाषा वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुलाने आयोजित केलेल्या 'भारतीय सौंदर्यशास्त्र: नवे दृष्टिकोन' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रातील बीजभाषण करतांना ते बोलत होते. यावेळी मंचावर संचालक डॉ. दिलीप चव्हाण, डॉ. वैजनाथ अनमुलवाड, डॉ. नीना गोगटे उपस्थित होते.



आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात ते म्हणाले, युरोपमध्ये प्लेटोचा सौंदर्याचा आदर्शवादी सिद्धांत प्रश्नांकित केला. पुढे फ्रेंच राज्यक्रांतीने नव्या तत्वांचा पुरस्कार करून जगाला मिथ्या समजणाऱ्या सिद्धांताला खोडले. भारतात कवी कालिदास यांनी कुमार सम्भवन तर कवी तुलशीदास यांनी रामचरितमानस या ग्रंथामध्ये सौंदर्य हे स्थायी मूल्य नसून ते व्यक्तिनिष्ठ आहे असे मानले.

भारतात युरोप प्रमाणेच अभिजाततेतील कलाबाह्य संकल्पना बदलून अधिक समावेशी सौंदर्यशास्त्राची मांडणी होत आहे. दलित, आदिवासी आणि स्त्रियांच्या साहित्याने सौंदर्याच्या नव्या निकषाना जन्म दिला आहे. भारतीय संविधानातील स्वातंत्र्य, समता आणि बंधुता (भगिनी भाव) या नव्या मूल्यांच्या आधारे नवे सौंदर्यशास्त्र घडवावे असे, मत चव्हाण यांनी व्यक्त केले.

डॉ. भगवान फाळके (अमरावती), डॉ. राहुल सरवटे (अहमदाबाद), डॉ. बजरंग बिहारी तिवारी, हनुमंत भवरे (पाबळ), डॉ. माधवी उईके (बालाघाट), डॉ. संजय लोहोकरे (अमरावती), डॉ. विक्रम चौधरी (सुरत) यांनी विविध सत्रामध्ये निबंध सादर केले.

भाषा संकुलाचे संचालक डॉ. दिलीप चव्हाण यांनी चर्चासत्राचे प्रास्ताविक केले अणि चर्चासत्राचे समन्वयक डॉ. वैजनाथ अनमुलवाड यांनी चर्चासत्राच्या आयोजनाची भूमिका मांडली. डॉ. नीना गोगटे, दिगंबर नेटके, रवी तातु यांनी विविध सत्रांचे सूत्रसंचालन केले. चर्चासत्राच्या दुसऱ्या दिवशी 'फुले-आंबेडकरी सौंदर्यशास्त्र' आणि 'भारतीय व पाश्चिमात्य सौंदर्यशास्त्र' या विषयांवर अभ्यासक मांडणी करणार आहेत. अशी माहिती समन्वयक डॉ. वैजनाथ अनमुलवाड यांनी दिली.

# विद्यापीठात बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील स्वागत कक्षामध्ये दि.२० फेब्रुवारी रोजी बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी.डी. पवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, हरीशकुमार पाटील, रामदास खोकले, गोविंदराव हंबर्डे, शिवाजी कल्याणकर, बबन हिंगे यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# घुंगराळा येथील खंडोबा देवस्थानचा अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** घुंगराळा ता. नायगाव येथील खंडोबा देवस्थानचा सप्ताह दि. १२ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी या कालावधीत उत्साहात संपन्न झाला.

या सप्ताह कार्यक्रमात दि.१२ फेब्रुवारी रोजी हभप मधुसूदन महाराज कापसीकर, दि. १३ फेब्रुवारी रोजी हभप संभाजी महाराज गंभीरे कुंभारगावकर, दि. १४ फेब्रुवारी रोजी हभप गणेशानंद शास्त्री महाराज भागवतीकर, दि. फेब्रुवारी रोजी हभप संतोष महाराज वनवे, दि.१६ फेब्रुवारी रोजी हभप कृष्णा महाराज राजूरकर, दि. १७ फेब्रुवारी रोजी हभप बाळू महाराज गिरगावकर, दि. १८ फेब्रुवारी रोजी हभप सुनीताताई आंधळे (आळंदी) व दि. १९ फेब्रुवारी रोजी हभप शिवानंद शास्त्री महाराज (पैठण) यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता झाली.



काल्याच्या किर्तनानंतर किर्तनकार हभप शिवानंद महाराज शास्त्री (पैठण) यांचा सत्कार बिलोलीचे पोलीस उपअधीक्षक रफिक शेख, शिवराज पाटील होटाळकर, पत्रकार बाळासाहेब पांडे, मनोज सावकार अरगुलवार यांच्या हस्ते गावकऱ्यांच्यावतीने करण्यात आला. सप्ताह कार्यक्रमास माजी जि.प. सदस्य पूनमताई पवार, माजी जि.प. सभापती शिवराज पाटील होटाळकर, माजी जि.प. सदस्य सूर्याजी पाटील चाडकर, पोलीस उपअधीक्षक बिलोली रफिक शेख, सहायक समाज कल्याण आयुक्त मिनगिरे, सहायक पोलीस निरीक्षक कुंटुर रामकृष्ण पाटील, नायगाव नगरपंचायतचे गटविकास अधिकारी वांजे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष विश्वनाथ बडूरे, भाजपचे तालुकाध्यक्ष दत्ता पाटील ढगे यांच्यासह अनेक पदाधिकारी व अधिकारी यांनी सप्ताह कार्यक्रमास भेट दिली, अशी माहिती वसंत सुगावे पाटील यांनी दिली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्यामराव यमलवाड, शेषेराव पाटील ढगे, नागोराव दंडेवाड, बालाजीराव मातावाड, व्यंकटराव पाटील सुगावे, चंद्रप्रकाश पाटील ढगे, माधवराव पाटील ढगे, राहूल सावकार बंदम वार, मुरहरी तुरटवाड, बालाजीराव हाळदेवाड, माधवराव जलदेवार, राम पाटील सुगावे, गोविंदराव पांचाळ, संभाजीराव तुरटवाड, शंकरराव यलपलवाड, गंगाधर पाटील ढगे, सुभाष पत्तेवार, महेश पाटील ढगे, साईनाथ पाटील सुगावे, गंगाधर पांचाळ, राजू आलेगटलेवार, गंगाधर पाटील ढगे, शंकर यमलवाड, गंगाधर पाटील सुगावे, राजेश पाटील ढगे, व्यंकटराव कंचलवाड, संभाजी पाटील सुगावे, गंगाराम सूर्यवंशी, बालाजी पत्तेवार, नामदेव तुरटवाड, संतोष पाटील सुगावे, साईनाथ पाटील ढगे, संजय सूर्यवंशी, राजेश सूर्यवंशी, माधव सूर्यवंशी यांच्यासह संपूर्ण गावकऱ्यांनी परिश्रम घेतले.

# अ.भा. ब्राह्मण महासंघाकडून शिवजयंती साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)–** नायगाव येथे अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ नायगाव शाखेच्यावातीने रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती दिवाणजी फॉर्म हाऊस बेटकवेळी रोड येथे साजरी करण्यात आली. यावेळी ब्राह्मण महासंघ जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पांडे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी वकील संघटना नायगाव तालुका अध्यक्ष ॲड. निलेश देशपांडे, जनता प्राथमिकचे मु.अ.गंगाधर चव्हाण, पळसगावचे प्रा.शाळा मु.अ. शाम कुलकर्णी, ब्रह्म मित्र रमेश शिंदे, मनसे मधुकर चव्हाण, डोणगावकर देशमुख, अ.भा.ब्राह्मण महासंघ जिल्हा युवा अध्यक्ष प्रज्योत कुलकर्णी, तालुकाध्यक्ष प्रसाद दिवाणजी, वेदशास्त्र संपन्न उमेश महाराज, तालुका युवाध्यक्ष रोहन जोशी, शिंदे पाटील, रवी चव्हाण, शिंदे पाटील, हर्ष नायगावकर आदींची उपस्थिती होती. या प्रसंगी सर्वांनी शिवरायांना अभिवादन केले.

# सिडको परिसरातील वृत्तपत्र विक्रेते पाल्यांसाठी परीक्षा पॅड व मिठाई वाटप करून शिवजन्मोत्सव साजरा




**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सिडको परिसरातील वृत्तपत्र विक्रेते पाल्यांसाठी परीक्षा पॅड व मिठाई वाटप करून शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला.

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी सिडको वृत्तपत्र विक्रेते संघटनेच्या दि. १९ फेब्रुवारी रोजी शिव जन्मोत्सवानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रारंभी ढोल ताशांच्या गजरात 'जय भवानी, जय शिवाजी...' आदी घोषणांनी शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पत्रकार रमेश ठाकूर यांच्यावतीने वृत्तपत्र विक्रेते पाल्यांसाठी मान्यवरांच्या हस्ते परीक्षा पॅड व मिठाई वाटप करण्यात आली.

यावेळी माजी उपमहापौर तथा शिवसेना शिंदे गटाचे दक्षिण जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, युवानेते उदय देशमुख, सेवानिवृत्त भुमिअभीलेख अधिकारी के. ना.जेटेवाड, काकडे, गणेश डोळस, पत्रकार रमेश ठाकूर, छायाचित्रकार सारंग नेरलकर, जेष्ठ वृत्तपत्र विक्रेते रामनाथ दमकोंडवार, शेख सयोद्दीन, दौलतराव कदम, एकनाथ श्रृंगारे, साहेबराव डोईबळे, शाम धावडे, गजानन धावंडे, महिला वितरक वंदना लोणे यांच्यासह वृत्तपत्र विक्रेते संघटनेच्ये अध्यक्ष सतिश कदम, बालाजी सुताडे, दिलीप ठाकूर व वृत्तपत्र विक्रेते बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गजानन महाराज मंदिरात प्रकट दिनानिमित्त महाप्रसाद

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सिडको येथील संत गजानन महाराज मंदिर संभाजी चौक सिडको येथे गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त महाअभिषेक, मिरवणूक व महाप्रसाद आयोजन करण्यात आले होते. तसेच हडको येथील गजानन महाराज मंदिर येथेही प्रकट दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे या २५ व्या वर्षी दि. २० फेब्रुवारी रोजी गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त सकाळी ७ ते ८ वेळेत श्रींचा अभिषेक अरूण कुलकर्णी यांच्या मंत्रोच्चाराने करण्यात आला. नंतर गजानन महाराज पालखी व गजानन महाराज फोटो असलेली मिरवणूक सिडको संभाजी चौक, संत गाडगेबाबा महाराज मंदिर, बालाजी मंदिर, महाराणा प्रतापसिंह पुतळा, महावीर चौक, मार्गे मंदिर परिसरात मिरवणूक काढण्यात आली. यावेळी मिरवणुकीमध्ये ढोल-ताशा-गजर, फटाक्यांची आतिषबाजी व काळा हनुमान मंदिर सिडको-हडको भजनी मंडळ व महिलांच्या समावेश होता. मिरवणुक संपन्न झाल्यानंतर महाप्रसाद आयोजन करण्यात आले होते.

हडको येथील गजानन महाराज मंदिर येथे प्रकट दिनानिमित्त महाअभिषेक व पुजा करण्यात आली. नंतर दुपारी महाप्रसाद आयोजन करण्यात आले होते. प्रकट दिनानिमित्त दोन्ही मंदिरात दर्शनासाठी भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात होती.

# सिडको येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा परिसर स्वच्छ करणाऱ्या पाच मुस्लिम बांधवांचा सत्कार

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सामाजिक बांधिलकी जोपासत गेल्या अनेक वर्षांपासून नियमित छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा परिसर स्वच्छ ठेवणाऱ्या पाच मुस्लिम बांधवांचा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सत्कार करण्यात आला.



सिडको येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून स्वच्छता व नियमित पुष्पहार घालणाऱ्या सिडको येथील मुस्लिम बांधव फुलविक्रेते शेख अझहर, शेख सय्यद वसिम, शोएब खान, मजहर सय्यद, सय्यद नदीम यांचा मनपाचे माजी उपमहापौर विनय पाटील गिरडे, संजय पाटील घोगरे, उदय देशमुख, माजी नगरसेवक संजय इंगेवाड, सिध्दार्थ गायकवाड, राजु लांडगे, नवनाथ कांबळे, रवी थोरात, धीरज स्वामीराजन जोजारे, विनायक आकुरके, डॉ.करूणा जमदाडे, रवी रायभोळे,व सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती पदाधिकारी त्र्यंबक कदम, दिलीप कदम, साहेबराव गाढे, संकेत पाटील, विश्वास हंबर्डे, पत्रकार रमेश ठाकूर यांनी शाल पुष्पहार घालून सत्कार केला.

हे पाच मुस्लिम बांधव नियमित छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा परिसर स्वच्छ ठेवणे, पुष्पहार अर्पण करणे, अशी नियमित सेवा बजावली आहे. या उल्लेखनीय कार्य कौतुकास्पद असल्याने त्यांची नोंद घेऊन त्यांचा शिवजयंतीचे औचित्य साधून सत्कार करण्यात आला.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

## गुगल मॅपवरून घरातील फोटो आणि व्हिडिओ कसे हटवाल?

**गुगल मॅप स्ट्रीट व्ह्यूमध्ये तुमच्या घराचे फोटो आणि व्हिडिओ असतात, जे तुमच्या गोपनीयतेसाठी धोकादायक ठरू शकतात. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही ते सहजपणे अस्पष्ट करू शकता. ते काढण्याची प्रक्रिया खूप सोपी आहे. गुगल मॅप्सवरून लोकेशन कसे ब्लर करायचे ते आम्हाला कळवा...**

तुमची सर्व माहिती गुगलवर उपलब्ध आहे. एआय टचच्या प्रवेशानंतर, डेटा गोपनीयतेचा मुद्दा जोरात सुरू झाला आहे. जर आपण गुगल मॅपबद्दल बोललो तर तुमचा डेटा गुगलवर मोठ्या प्रमाणात वापरला जातो. विशेषतः गुगल मॅप स्ट्रीट व्ह्यूमध्ये घराच्या स्थानासह फोटो आणि व्हिडीओ असतात, जे तुमच्या गोपनीयतेसाठी धोकादायक ठरू शकतात. अशा परिस्थितीत, जर तुम्हाला गुगलने तुमच्या घराचे फोटो आणि व्हिडीओ गुगल मॅपवर दाखवू नये असे वाटत असेल, तर तुम्ही ते सहजपणे ब्लर करू शकता.

### काय कराल?

सर्वप्रथम गुगल मॅप उघडा. यानंतर गुगल मॅपवर तुमची मालमत्ता शोधा. यानंतर तुम्हाला जो स्ट्रीट व्ह्यू इमेज ब्लर करायचा आहे तो पर्याय उघडा. त्यानंतर तुम्हाला तुमच्या मालमत्तेवरील समस्या नोंदवा या पर्यायावर क्लिक करावे लागेल. यासाठी, तुम्हाला वरच्या उजव्या कोपऱ्यात क्लिक करावे लागेल आणि समस्या नोंदवा पर्यायावर टॅप करावे लागेल. त्यानंतर तुमच्या समोर एक पेज उघडेल, जिथे तुमच्या प्रॉपर्टीवर लाल रंगाचा आयकॉन दिसेल. तुम्ही तुमच्या गरजेनुसार आयकॉन बदलू शकता. यानंतर तुम्हाला कमांड द्यावी लागेल की तुम्हाला काय ब्लर करायचे आहे? तुम्हाला A face, My home, my vehicle, a lifesail आणि A या वेगवेगळ्या ऑब्जेक्ट पर्यायांवर क्लिक करावे लागेल. तसेच, तुम्हाला ती प्रतिमा का अस्पष्ट करायची आहे याची माहिती द्यावी लागेल. त्यानंतर तुम्हाला तुमचा ईमेल आयडी टाकावा लागेल. कृपया लक्षात ठेवा की तुम्ही तुमचा ई-मेल आयडी न टाकता तुमचे स्थान अस्पष्ट करू शकत नाही. यानंतर तुम्हाला कॅप्चा कोड टाकावा लागेल. त्यानंतर तुम्हाला सबमिट बटणावर टॅप करावे लागेल. यानंतर तुमचे स्थान गुगल मॅपवर अस्पष्ट होईल. जेव्हा जेव्हा कोणी गुगल मॅप्सवरील स्ट्रीट व्ह्यू फीचर पाहेल तेव्हा त्यांना तुमचे स्थान अस्पष्ट दिसेल.





## Google Maps वापरताना...

**तुम्ही Google Maps चा वापर करत असाल तर आधी ही बातमी वाचा. Google Maps चा वापर करून अनेक जण रोज आपल्या ठरलेल्या ठिकाणी पोहोचतात. मार्ग माहित नसताना Google Maps हेच कामी येते, पण यावेळी Google Maps चा वापर केल्याने तीन जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. उत्तर प्रदेशातील बरेली जिल्ह्यातील फरीदपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत GPS ची अचूक माहिती न मिळाल्याने हा अपघात घडला. अशावेळी Google Maps वापरताना काही महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घेणं अत्यंत गरजेचं आहे...**

### कोणती काळजी घ्यावी?

- Google Maps बहुतेक अचूक माहिती देत असले तरी काही वेळा त्यावर अवलंबून राहणे धोक्याचे ठरते.
- काही दिवसांपूर्वी Google Maps मुळे दोन मित्र चुकीच्या वाटेवर गेले होते. ज्यामुळे अपघात झाला.
- Google Maps वरून तुम्ही कुठे जात असाल तर चालण्यापूर्वी एकदा तपासून घ्या की Google Maps वर चुकीची ॲक्टिव्हिटी तर नाही ना.
- कधी कधी Google Maps नदी, अज्ञात किंवा निर्जन मार्ग दाखवतो आणि काही लोक त्यावर चालतात, परंतु असे करणे धोकादायक असू शकते. त्यामुळे हे टाळले पाहिजे.
- Maps समजत नसेल तर स्थानिक लोकांची मदत घेण्याचा प्रयत्न करा. त्यासाठी तुम्हाला काही मिनिटे लागतील, पण माहिती बरोबर असेल.
- Google Maps च्या नवीन फीचर्ससह स्वतः ला अपडेट ठेवणे खूप महत्वाचे आहे, जेणेकरून तुम्ही अडचणीत अडकल्यास तुम्हाला या फीचर्सची मदत मिळू शकेल.
- कोठेही जाण्यापूर्वी Google Maps अपडेट करणे देखील खूप महत्वाचे आहे.

### Google Maps वर कधी विश्वास ठेवावा?

- Google Maps वर आंधळेपणाने विश्वास ठेवणे योग्य नाही. तुम्ही Google Maps ची मदत घेऊ शकता, पण त्यावर अवलंबून राहू शकत नाही. जर तुम्ही मोठ्या रस्त्यावरून जात असाल तर इथेच Google Maps काम करतो, कमकुवत इंटरनेट असेल तर Google Maps तुम्हाला अडचणीत आणू शकतो. त्यामुळे नेहमी योग्य इंटरनेट कनेक्शन ठेवा. तसेच Google Maps वापरताना सावधगिरी बाळगणे अत्यंत गरजेचे आहे.

### लोकांकडून मार्गाची योग्य माहिती मिळवा

- Google Maps अशा ठिकाणी चुकीचा मार्ग दाखवतो, जो फारसा सामान्य नसतो आणि नवीन असतो, असे अनेकदा दिसून आले आहे. अशा वेळी तेथील लोकांकडून मार्गाची योग्य माहिती मिळवणे हाच उत्तम मार्ग आहे.

**सध्याच्या डिजीटल युगात अनेक गोष्टी आता स्मार्टफोनवर अवलंबून असल्याचं दिसून येत आहे. म्हणजे अगदी आपल्या मनोरंजनाच्या कामांपासून ते महत्त्वाच्याा कामांपर्यंत सारंकाही स्मार्टफोनवर अवलंबून असतं. दरम्यान अशात स्मार्टफोनच्या वाढत्या गरजांमुळे स्मार्टफोनचा वापरही आजकाल खूप प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे स्मार्टफोन काही काळासाठी खराब झाला किंवा बंद पडला तरी आपल्याला ते परवडत नाही. पण स्मार्टफोन वापरताना तुम्हाला अनेक गोष्टींची विशेष काळजी घ्यावी लागते. कारण तुमच्या एका चुकीमुळे तुमचा फोन बिघडून बंद होऊ शकतो. तसंच तुम्हाला हजारो रुपयाचं नुकसान देखील होऊ शकतं. आता तुम्ही विचार करत असाल की अशा कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी लागत असेल, तर याच काही गोष्टींबद्दल आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत...**

## स्मार्टफोन वापरताना होणाऱ्या चुका!

- अतिगेमिंग धोकादायक : मोबाईल फोन वापरताना अनेकजण बराच वेळ गेमिंग करत असल्याचं अनेकदा दिसून येतं. यामुळे स्मार्टफोनचा परफॉर्मन्सही खूप कमी होतो. म्हणूनच गेमिंग करताना तुम्ही प्रत्येक गोष्टीची बारकाईने काळजी घेतली पाहिजे. तसेच, सतत गेमिंग करणे देखील स्मार्टफोनच्या बॅटरीसाठी हानिकारक आहे. यामुळे तुमच्या स्मार्टफोनच्या मदरबोर्डवरही परिणाम होतो. ज्यामुळे तुम्हाला मोठं नुकसान होऊ शकते.
- चार्जिंग करताना काळजी घ्या : स्मार्टफोनची चार्जिंग ही एक महत्त्वाची गोष्ट असते. दरम्यान या चार्जिंगच्या वेळेवरही तुम्हाला खूप लक्ष द्यावे लागते. सतत चार्जिंग केल्यानेही स्मार्टफोन खराब होऊ शकतो. तसेच, ते दुरुस्त करण्यासाठी लांब जावं लागणार आहे. तसंच स्मार्टफोन चार्ज करताना काळजी घ्यावी लागणार आहे, कारण चार्जिंगची वेळ देखील खूप महत्वाची आहे. ओव्हरचार्जिंग देखील स्मार्टफोनसाठी हानिकारक आहे.
- सतत लेटेस्ट अपडेट कराः अनेक वेळा आपण पाहतो की, स्मार्टफोन सतत वापरूनही अपडेट करत नाही. हे तुमच्या डिव्हाइससाठी चांगले नाही. त्यामुळे तुम्हाला अनेक गोष्टींची विशेष काळजी घ्यावी लागेल. जर तुमचा स्मार्टफोन अपडेटेड असेल तर त्याचे हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर दोन्ही चांगले काम करतील. यामुळेच तुम्ही वेळोवेळी फोन अपडेट करत राहावे. असे न करणे तुमच्या फोनसाठी देखील हानिकारक आहे.



### जास्त कनेक्टिव्हिटी टाळणं गरजेचं

आजकाल आपला फोन सतत इंटरनेटशी कनेक्ट असतो, म्हणजे कायम त्याचं इंटरनेट ऑनच असतं. पण अशामध्ये सतत इंटरनेटशी फोन कनेक्ट केल्याने तुमची बॅटरी जलदगतीने संपू शकते. ज्यामुळे स्मार्टफोन लवकर खराब होऊ शकतो. तसंच मोबाईल हॉटस्पॉट वापरणे, दीर्घ काळासाठी GPS वापरणे, व्हिडिओ पाहणे, म्युझिक ऐकणे यामुळे तुमची बॅटरी कमी असताना ती आणखीच उतरू शकते. तसंच कॉलिंगमुळेही बॅटरी उतरते. विशेष म्हणजे रोमिंगमध्ये प्रवास करताना जास्त कॉल केले तरी बॅटरी लवकर संपते. त्यामुळे चार्ज कमी असताना सततची कनेक्टिव्हिटी टाळणं गरजेचं आहे.

### हेवी ॲप्लिकेशनचा वापर टाळा

अनेक रिपोर्ट्समधून आणि प्रॅक्टिकलमधून हे समोर आलं आहे की, बॅटरी जास्त काळ वापरण्यासाठी, कमी चार्जमध्ये असताना मोठमोठ्या म्हणजेच हेवी ॲप्लिकेशन्सचा वापर करणं टाळायला हवं. म्हणजेच तुम्ही कॅमेराचा जास्त वापर करू नये किंवा कोणतेही अधिक बॅटरी खाणारे ॲप्लिकेशन्स सतत वापरणे टाळावे. जसं की सोशल मीडियावर रिल्स पाहणे, मोठ्या ग्राफिक्सचे गेम खेळणे, या साऱ्या गोष्टी करणं टाळावं लागणार आहे.

## ग्रहांची परेड...

### सर्व ग्रह येणार एका रांगेत!; भारतात हे दुर्मिळ दृश्य कधी दिसेल?

**खगोलशास्त्रात रस असलेल्यांना २८ फेब्रुवारी रोजी आकाशात एक दुर्मिळ दृश्य पाहण्याची संधी मिळेल. या काळात, सूर्यमालेतील सर्व ग्रह अंतराळात एकत्र दिसतील. या घटनेला ग्रह परेड म्हणतात. २८ फेब्रुवारीची रात्र गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या ग्रहांच्या परेडचा कळस असेल. शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की ही परेड खूपच दुर्मिळ आहे आणि पुढील १५ वर्षांपर्यंत ती पुन्हा दिसणार नाही. यानंतर, ग्रहांची अशी परेड फक्त २०४० मध्येच पाहता येईल.**

२८ फेब्रुवारी रोजी आकाशात ग्रहांची ही एक दुर्मिळ भेट असेल, जेव्हा सर्व ग्रह थोड्या काळासाठी एकत्र दिसतील. हे पाहण्यासाठी शहरातील दिव्यांपासून दूर असलेल्या मोकळ्या मैदानात जाणे चांगले राहील, असे तज्ञांचे म्हणणे आहे. जर या काळात हवामान स्वच्छ राहिले तर युरेनस आणि नेपच्यून वगळता सर्व ग्रह उघड्या डोळ्यांनी दिसतील. युरेनस आणि नेपच्यून पाहण्यासाठी तुम्हाला दुर्बिणीची आवश्यकता असेल. तज्ज्ञांच्या मते, पूर्वेला मंगळ, आग्नेय दिशेला गुरु आणि युरेनस तर पश्चिमेला शुक्र, नेपच्यून आणि शनि दिसतील.



### ग्रहांची ही परेड विशेष का आहे?

खगोलशास्त्रज्ञांच्या मते, जेव्हा ग्रह सूर्याच्या एका बाजूला एकत्र दिसतात तेव्हा ग्रहांची परेड होते. या परेडमध्ये तीन ते आठ ग्रहांचा समावेश असू शकतो. एका प्रमुख परेडमध्ये सहसा पाच किंवा सहा ग्रह असतात. २८ फेब्रुवारी रोजी घडणारी ही ग्रहांची परेड सर्वात दुर्मिळ घटना आहे. गेल्या महिन्यात, जानेवारीमध्ये आंशिक ग्रहांच्या परेडसह क्वाड्रंटिड उल्कावर्षाव झाला. २८ फेब्रुवारी रोजी होणारा कार्यक्रम दुर्मिळ असल्याने तो खूप खास असण्याची अपेक्षा आहे. ग्रहांची ही परेड संपूर्ण भारतात दिसून येईल. देशातील बहुतेक शहरांमध्ये लोकांना हा दुर्मिळ कार्यक्रम पाहता येईल. जर हवामान स्वच्छ नसेल तर दुर्बिणीद्वारे हे दृश्य अनुभवता येते. खगोलशास्त्रज्ञ या घटनेची वाट पाहत होते.

### ग्रहांची परेड कधी होते?

ग्रहांची परेड म्हणजे पृथ्वी आणि सौर मंडळातील इतर ग्रह सूर्याच्या एका बाजूला सरळ रेषेत येणार आहेत. ही शक्यता दुर्मिळ आहे. कारण सर्व ग्रह एकाच बाजूला येत नाहीत. परंतु काही ग्रह एका रेषेत येतात. सहा ग्रहांचे एका ओळीत येणे देखील खूप खास आहे. जेव्हा ग्रह आकाशात सरळ रेषेत दिसतात तेव्हा ही घटना आणखी नाट्यमय होते.

## २, ३ की ४? उन्हाळ्यात फ्रिज किती नंबरवर चालवावे?

**तुम्हाला फ्रिज ऋतूनुसार किती नंबरवर सेट करावे किंवा चालवावे, याविषयीची माहिती आहे का? आता उन्हाळा येत असून उन्हाळ्यात फ्रिज किती नंबरवर चालवायला हवे? याची माहिती असणं गरजेचं आहे. नसेल माहिती तर चिंता करू नका. आज आम्ही तुम्हाला याविषयीची सविस्तर माहिती देणार आहोत. तसेच फ्रिज लवकर खराब होऊ नये, यासाठी काय करायला हवं, हे देखील जाणून घ्या.**

आजकाल प्रत्येक घरात फ्रिजचा वापर केला जातो. विशेषतः उन्हाळ्यात हे खूप महत्त्वाचं ठरतं. आता बाजारात चांगले फ्रिज कमी किमतीत मिळत असल्याने ते खरेदी करणे सोपे झाले आहे. परंतु बरेच लोक त्याच्या देखभालीकडे लक्ष देत नाहीत. यामुळे फ्रिज लवकर खराब होऊ शकते किंवा ब्लास्टिंगचा धोका वाढू शकतो. तुम्हालाही तुमच्या फ्रिजचा बराच काळ योग्य वापर करायचा असेल तर या महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवणे गरजेचं आहे.

### फ्रिजसाठी योग्य तापमान किती असावे?

फ्रिज कोणत्या तापमानावर सेट करावा किंवा चालवावा याचा विचार अनेकदा लोक करतात. बहुतेक फ्रिजमध्ये तापमान १ ते ५ आकड्यांपर्यंत सेट केले जाऊ शकते. उन्हाळ्यात फ्रिज ३ ते ४ क्रमांकावर ठेवणे चांगले, जेणेकरून खाणे-पिणे व्यवस्थित थंड होईल आणि खराब होणार नाही. हिवाळ्यात काही लोक फ्रिज बंद करतात, हा योग्य मार्ग नाही. थंड हवामानात फ्रिज १ नंबरवर चालवावे. फ्रिज बराच वेळ बंद ठेवल्यास त्याचा कॉम्प्रेसर जॅम होऊन गरम होऊ शकतो आणि चालू केल्यावर खराब होऊ शकतो.

### फ्रिजच्या स्फोटाची कारणे कोणती?

अनेकदा फ्रिजमध्ये बिघाड झाला की लोक लोकल पार्टचा वापर करतात. पण, हे खूप धोकादायक ठरू शकते. विशेषतः कॉम्प्रेसरशी संबंधित बिघाडासाठी नेहमी कंपनीच्या सर्व्हिस सेंटरमधून दुरुस्ती करून घ्या. स्थानिक भागांचा वापर केल्यास कॉम्प्रेसरमधील दाब वाढू शकतो आणि त्याचा स्फोट होऊ शकतो. त्यामुळे फ्रिजच्या कोणत्याही बिघाडाकडे दुर्लक्ष करू नका आणि नेहमी ओरिजिनल पार्ट्सचा वापर करा.

### फ्रिज वारंवार उघडू नका

फ्रिज उघडताच बाहेरची गरम हवा आत जाते आणि थंड हवेत मिसळून ओलावा निर्माण होतो. यामुळे बर्फ आत गोठतो. असं झाल्याने फ्रीजरच्या योग्य कार्यात अडथळा येऊ शकतो. फ्रिजमध्ये कमी बर्फ हवा असेल तर गरज असेल तेव्हाच उघडा.



# आसियान देशांमधील महिला उद्योजकांचे परस्पर सहकार्य कौतुकास्पद –राज्यपाल



**मुंबई (प्रतिनिधी)–** आसियान देशांमधून भारत भेटीवर आलेल्या महिला उद्योजिका फिक्की महिला आघाडीच्या सहकार्याने भारतातील उद्योगांशी करीत असलेले परस्पर सहकार्य कौतुकास्पद असून यातून सर्व देशांमधील महिला उद्योजकांना प्रेरणा मिळेल असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज येथे केले.

भारत आणि आसियान देशांमधील २० आघाडीच्या महिला उद्योजकांच्या एका शिष्टमंडळाने शुक्रवारी महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची राजभवन मुंबई येथे भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते.

भारत आणि आसियान देशांमधील उद्योजकांमध्ये सहकार्य वाढविण्याच्या दृष्टीने सर्व देश परस्परांशी थेट विमानसेवेने जोडणे आवश्यक आहे असे सांगून नवी मुंबई विमानतळ लवकरच सुरु होत असून त्यानंतर मुंबई अनेक देशांशी थेट विमान सेवेने जोडले जाईल व त्यातून उद्योगांना चालना मिळेल असे राज्यपालांनी सांगितले.

भारताची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकाहून तिसरी मोठी अर्थव्यवस्था होण्याकडे वाटचाल करीत असून भारतासोबत व्यापार वाढविण्यासाठी सध्याची वेळ अतिशय योग्य असल्याचे राज्यपालांनी सांगितले. महिला उद्योजिकांनी महाराष्ट्राला भेट दिल्याबद्दल राज्यपालांनी त्यांना धन्यवाद दिले. आसियान देशांमधील महिला उद्योजक नेत्यांच्या या भेटीचे आयोजन फिक्की संसथेच्या महिला विभागाद्वारे करण्यात आले होते.यावेळी फिक्की मुंबई महिला विभागाच्या अध्यक्षा आर्मीन दोर्डी व आसियान इंडिया अध्यक्षा विनिता बिंबेट यांनी महिला उद्योजिकांच्या भारत भेटीबाबत माहिती दिली.

फिलिपिन्स येथील संस्थेच्या आसियान सह–अध्यक्षा पॅसीटा जुआन, उद्योजिका मारिया ख्रिस्तिना कॉन्सेपसियान, तसेच इतर फिलिपिन्स आणि म्यानमार येथील महिला उद्योजिका यावेळी उपस्थित होत्या.

आसियान देशांतील महिला उद्योजिका आरोग्यसेवा यांसह विविध क्षेत्रांमध्ये व्यावसायिक सहकार्य वाढविण्यासाठी भारतभेटीवर आल्या आहेत.

# मणिपूरमध्ये १७ दहशतवाद्यांना अटक



**मुंबई (प्रतिनिधी) –** णिपूरमध्ये गेल्या २४ तासांत ४ जिल्ह्यांमधून अनेक बंदी घातलेल्या संघटनांशी संबंधित १७ दहशतवाद्यांना अटक करण्यात आल्याची माहिती इंफाल पोलिसांनी आज दिली.यासंदर्भात पोलिसांनी सांगितले की, राज्याच्या बिष्णुपूर जिल्ह्यातील मोइरांग कियाम लीकाई भागातून बंदी घातलेल्या कांगलेई यावोल कन्ना लुप (केवायकेएल) संघटनेशी संबंधित १३ दहशतवाद्यांना गुरुवारी २० फेब्रुवारी रोजी अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून २७ जिवंत काडतुसे, ३ वॉकी–टॉकी सेट, कॅमफ्लाज युनिफॉर्म आणि इतर सामरिक वस्तू देखील जप्त करण्यात आल्या, आहेत. त्याचप्रमाणे इंफाल–पूर्व जिल्ह्यातील न्गारियन चिंग भागातून प्रतिबंधीत युनायटेड नॅशनल लिबरेशन फ्रंटच्या (पी) एका दहशतवाद्याला अटक करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

अटकेतील आरोपी खंडणीच्या गुन्ह्यात लिप्त होता. तसेच सुरक्षा दलांनी गुरुवारी बिष्णुपूर जिल्ह्यातील न्गाईखोंग खुल्लान भागातून कांगलेईपाक कम्युनिस्ट पार्टी (सिटी मेइतेई) च्या एका कार्यकर्त्यांला अटक केली.काकचिंग जिल्ह्यातील काकचिंग सुमक लीकाई भागातून पोलिसांनी खंडणीच्या कारवायांमध्ये सहभागी असलेल्या कांगलेई यावोल कन्ना लुपच्या (केवायकेएल) सक्रिय कार्यकर्त्यांना अटक केली. पोलिसांनी सांगितले की, सुरक्षा दलांनी इंफाल– पश्चिम जिल्ह्यातील फिडिंगा येथून केसीपीच्या (पीडब्ल्यूजी) एका कॅडरला देखील अटक केली आहे.

## आक्षेपार्ह माहिती टाकणाऱ्या ४ जणांवर गुन्हा दाखल

**मुंबई (प्रतिनिधी)–** छत्रपती संभाजी महाराजांबद्दलचा विकिपीडियावर असलेला आक्षेपार्ह मजकूर न हटविल्याबद्दल आता महाराष्ट्र सायबर पोलिसांनी चार एडिटर्स विरोधात गुन्हा दाखल केला आहे. विकिपीडियाची कॅलिफोर्नियास्थित असलेल्या नोडल एजन्सी विकिमीडिया फाउंडेशनला नोटीस पाठवून सदर आक्षेपार्ह मजकूर हटविण्यास सांगितले गेले आहे. विकिमीडिया ही स्वयंसेवी संस्था असून त्यांच्याद्वारे विकिपीडियाचे संचलन केले जाते.

महाराष्ट्र सायबर सेलने पाठविलेल्या नोटीसमध्ये म्हटले की, छत्रपती संभाजी महाराजांबद्दल विकिपीडियावर असलेला मजकूर चुकीचा आणि आक्षेपार्ह असा आहे. यामुळे महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ शकते. मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे सुपुत्र छत्रपती संभाजी महाराज हे भारतात पूजनीय आहेत.

## जाहीर प्रगटनास आक्षेप

दि.१९/२/२०२५ रोजी दै. प्रजावणीच्या पान क्र.६ वर ॲड. प्रदीप हनमंतराव देशमुख यांनी दिलेल्या जाहीर प्रगटनास आक्षेप

मी खालील सही करणार यांनी श्री रामराव बालाजीराव पाटील (माजी विधान परिषद सदस्य) रा.रातोळी ता.नायगांव खै जि.नांदेड यांच्यासोबत माझ्या मालकी व ताब्यातील मौजे कांकाडी तर्फे तुप्पा ता.जि.नांदेड येथील शेत गट नंबर २१६ पैकी १ हेक्टर ९० आर जमिनीबाबत केंव्हाही कोणत्याही प्रकारचा करार केला नाही/ व्यवहार केला नाही.त्याचप्रमाणे व्यवहार न केल्यामुळे त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारची करारापोटी इसारा रक्कम पण घेण्याचा प्रश्न येत नाही म्हणून ॲड.प्रदिप हनमंतराव देशमुख यांनी दिलेल्या जाहीर प्रगटनास मी सदरचा आक्षेप नोंदवित आहे.

**जाहीर प्रगटन देणार**
**श्रीमती पुष्पा राजेश चांडक**
**रा.वृंदावन कॉलनी,भाग्यनगर रोड नांदेड**

## पाहिजेत

नांदेड येथील नॅशनल आय.टी.आय.मध्ये विविध तांत्रिक कोर्सेस मध्ये प्रवेश देण्यासाठी एका अनुभवी संबंधीत विषयातील पदविधर व्यक्तीची ADMISSION COUNSELOR प्रवेश प्रचारक ची नियुक्त करावयाची आहे. इच्छूक उमेदवारांनी ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसाच्या आत प्राचार्य, नॅशनल आय.टी.आय.माळटेकडी रोड नांदेड या पत्यावर आपले अर्ज सादर करावे.

**:प्राचार्य :**
**नॅशनल औद्योगिक प्रशिक्षण संस्था**
**मालटेकडी रोड, देगलूर नाका ,नांदेड**
**मो. ९०२८९८२४५१**

## जाहीर समन्स

निशाणी क्र.१९

लोहा येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात समक्ष :– श्री. अ. वि. डाखोरे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, नांदेड.) नियमीत दिवाणी दावा क. २१९/२०१६

प्रति

नॉन काउंटर क्लेमंड क. २–ड)

अंबुबाई भ्र. व्यंकटराव गोस्केवार, वय ६२ वर्षे, धंदा घरकाम, रा. माहेश्वरी भवना जवळ कौठा नांदेड, ता. जि. नांदेड

ज्याअर्थी उपरोक्त वादातील वादी अंजली भ्र. बालाप्रसाद आन–लदास मार्केट नांदेड, ता. जि. नांदेड यांनी आपल्या विरूध्द वरीलप्रमाणे याचिका दाखल केली आहे प्रस्तुत याचिकेत आपणांस प्रविवादी केले आहे सदर प्रकरणात आपणांस आपली बाजू मांडण्याकरीता या न्यायालयातर्फे ब–याच वेळा अर्जात नमूद पत्त्यावर समन्स पाठविण्यात आले होते, परंतु असे दिसून येत आहे की, नमुद पत्यावर आपण मिळुन येत नाहीत किंवा आपला ठावठिकाणा आढळत नाही, किवां आपण जाणून बूजून सदर प्रकरणातील समन्स स्विकारण्यास टाळाटाळ करीत आहात,

त्याअर्थी उपरोक्त नमूद प्रकरणात आपल्या नावे हे जाहीर समन्स पाठविण्यात येत असून आपणास याव्दारे सुचित करण्यात येते की, आपण स्वतः अगर वकीला मार्फत दिनांक ०५/०३/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता उपरोक्त प्रकरणात हजर होवून आपली बाजू मांडावी, नसता आपणास या प्रकरणात काहीही सांगावयाचे नाही असे समजून उपरोक्त प्रकरण आपल्या विरूद्ध एकतर्फी निकाली काढण्यात येईल. आज दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयाने दिले.

**आदेशावरून**
**कनिष्ठ लिपिक** **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, लोहा**

## जाहीर प्रगटन

तालुका कार्यकारी दंडाधिकारी हिमायतनगर यांचे न्यायालयात प्रकरण : जन्म / मृत्यु नोंदणी सुधारणा कायदा २०२३ मध्ये कलम ११ (३) अन्वये अर्ज क्र.–/२०२४

श्री–मारोती सुधाकर सुर्यवंशी रा.सरसम ता.हिमायतनगर जि.नांदेड

विरूद्ध

जन्म मृत्यू नोंदणी निबंधक अधिकारी ग्रामपंचयात कार्यालय सरसम ता.हिमायतनगर जि.नांदेड

विषय:– जन्म / मृत्यु नोंदणी सुधारणा कायदा २०२३ मध्ये कलम ११ (२ व ३) वेंदात मारोती सुर्यवंशी यांच्या जन्माची नोंद घेणे करीता आदेशीत करणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार मारोती सुधाकर सुर्यवशी रा.सरसम बु.ता. हिमायतनगर जि.नांदेड यांनी त्यांचा मुलगा वेदांत मारोती सुर्यंवशी यांचा जन्म दिनांक ९/११/२००८ रोजी मौजे सरसम बु ता.हिमायतनगर येथे झाला असून सदर जन्माची नोंद जन्म / मृत्यु नोंदणी सुधारणा कायदा २०२३ मध्ये कलम ११ (२ व ३) अन्वये घेण्याकरीता जन्म मृत्यू नोंदणी निबंधक ग्राम पंचयात कार्यालय सरसम बु ता.हिमायतनगर जि.नांदेड यांना आदेशीत करण्यासाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.ज्याअर्थी वेदांत मारोती सुर्यंवशी यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय सरसम बु ता.हिमायतनगर जि.नांदेड येथे उप–लब्ध नाही त्या अर्थी या जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधीतांस कळविणयित येते की, अर्जदार मारोती सुधाकर सुर्यवंशी यांचा मुलगा वेदांत मारोती सुर्यवंशी यांचा जन्म दिनाक ९/११/२००८ च्या रोजी जन्माची नोंद घेणे विषयी कोणास आक्षेप किंवा उजर असेल तर त्यांनी आपला आक्षेप अथवा उजर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या कार्यालयात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा.मुदतीत आक्षेप किंवा उजर न आल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल

**तालुका दंडाधिकारी**
**हिमायतनगर**

## Kindly note Change in name

My old name is Shyamrao Bapurao Telang This now I am changing as N Shyam Bapurao Telang So henceforth my all correspondence should be done by my new name..so all are requested to note it. Thanks Address: Shyam Bapurao Telang 3-1-96 Telang Nivas, Doctor Lane,near Bus stand, Nanded Mo.9422151184

## Kindly note Change in name

My old name is Sharda Shyamrao Telang. This now I am changing as Sharda Shyam Telang. So henceforth my all correspondence should be done by my new name..so all are requested to note it. Thanks. Address-Sharda Shyam Telang H no.3-1-296 Telang Nivas, Doctor Lane,near Bus stand, Nanded. Mo.9422155384

## Change In Name

My Old Name is PRAKASH MAHADEO PAIKRAO which now I am changing as New Name PRAKASH MAHADEV PAIKRAO. Henceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same SIGN BY- PRAKASH MAHADEV PAIKRAO C/O M.J.PAIKRAO G.N.110 PLOT NO.18 GAURAV NAGAR TATHAGAT NAGAR MALEGAON ROAD TARODA BK NANDED 431605 MO.7020848300












## जाहीर प्रगटन

श्री सय्यद खायमोद्दीन रहिमोद्दीन, सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अर्धापूर यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणीअर्ज(आर.जे.ई.)क्रमांक: २/२०२५

अर्जदार क्र. :१.लक्ष्मीबाई भ्र. गुणाजी सोनटके, वय ७४ वर्षे, धंदा घरकाम २सवित्रा भ नारायण सोनटक्के, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम ३.तुळशीराम पि. नारायण सोनटक्के,वय २२ वर्षे, धंदा शिक्षण ४.गितेश पि. नारायण सोनटक्के, वय २० वर्षे, धंदा शिक्षण ५.प्रतिक्षा पि. नारायण सोनटक्के,वय १९ वर्षे, धंदा– शिक्षण सर्व रा. महात्मा फुले नगर, अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड.

विरुध्द निरंक

विषय:– बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट, कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, अर्जदार लक्ष्मीबाई भ्र. गुणाजी सोनटक्के यांनी त्यांच्या विधिज्ञ श्री. माटे ध. झ यांच्या मार्फत या न्यायालयात कि. दि. अर्ज क्र. ३२/२०२५ दाखल केला आहे. अर्जदार यांच्या मते मयत नारायण पि. गुणाजी सोनटक्क ह रा. अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड येथील राहणारे असून त्यांचा मृत्यू दि. ०३.०८.२०१८ रोजी अर्जदारांनी या न्यायालयात मयताचे वारस म्हणून अर्जदारांचे नावे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केलेला आहे.

तरी, या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व संबंधीतांस सुचित करण्यात येते आहे की, उपरोक्त अर्जदार यांच्या हक्कात वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा काही आक्षेप अगर उजर असेल तर त्यांनी आपले आक्षेप दिनांक १५.०३.२०२५ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होउन नोंदवावेत, अन्यथा आक्षेप नाही असे समजुन एकतर्फी निकाल दिला जाईल याची नोंद घ्यावी.आज दिनांक ०१.०२.२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशावरुन**
**क.लिपीक** **सहाय्यक अधिक्षक**
**सह दिवाणी न्यायालय क.स्तर अर्धापुर**

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकाराने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन सर्व जनतेच्या व संबंधितांच्या माहितीस्तव हे जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात येते की, ना.वा.श.म.न.पा. हद्दीतील आनंद नगर, सहकारी भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था म. असदुलाबाद, नांदेड मधील संस्थेच्या मालकीच्या सर्व्हे नं. ३६ मधील सि.टी. सर्व्हे नं. १००१६ प्लॉट क्र. ८५ चा दक्षिणेकडील भाग ज्याची लांबी : पूर्व–पश्चिम : १५ मी व रुंदी दक्षिण–उत्तरः ११ मी. ज्याचे एकूण क्षेत्रफळ १६५ चौरस मीटर आहे. ज्याच्या चतु:सिमा– पुर्वेस : ०९ मी रुंद रोड, पश्चिमेस : विद्युतनगरमधील प्लॉट दक्षिणेस : प्लॉट क्र. ८६,उत्तरेस : सदरील प्लॉट चा भाग जो यापुर्वीच श्री. संदिप मारोतराव देवकत्ते यांना बक्षिस दिला आहे.

येणेप्रमाणे चतुःसिमेच्या आतील प्लॉट क्र. ८५ चा दक्षिणेकडील भाग हा संस्थेने संस्थेचे मुळ सभासद सौ. लक्ष्मीबाई भ्र. मारोतराव देवकत्ते पाटील यांना प्लॉट वाटप प्रमाणपत्राव्दारे वाटप केलेला असून त्याबाबत संस्थेने त्याच्या नावे प्लॉट वाटप प्रमाणपत्र सुध्दा दिलेले आहे.

हे की, संस्थेचे वर नमुद मुळ सभासद सौ. लक्ष्मीबाई भ्र. मारोतराव देवकत्ते पाटील यांनी सदरील प्लॉट नंबर ८५ चा दक्षिणेकडील भाग त्यावरील दोन मजली आर.सी.सी बांधकामासह त्यांचा मुलगा अर्जदार श्री. संदिप पि. मारोतराव देवकत्ते पाटील रा. आनंद नगर यांना रजिस्टर्ड बक्षिसपत्र दस्त क्र. १५६१/२०२१ दि.०७/०२/२०२५ अधारे कायमचे बक्षीस दिला आहे असे अर्जदाराने संस्थेकडे सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. वर नमुद बक्षिसपत्राव्दारे झालेले हस्तांतरण हे संस्थेच्या संमतीविना झाले आहे. त्यामुळे सदरील हस्तांतरणाची नोद संस्थेकडे झालेली नाही. परंतु आता अर्जदार श्री.संदिप पि. मारोतराव देवकत्ते पाटील यांनी त्यांना संस्थेचा सभासद करुन घेणे व वर नमुद प्लॉट त्यांच्या नावे हस्तांतरण करुन प्लॉट वाटप प्रमाण पत्र देण्याबाबत विनंती अर्ज करुन वर नमुद बक्षिसपत्र व विहीत नमुन्यातील इतर अवश्यकती कागदपत्र संस्थेकडे सादर केलेली आहेत.

तरी श्री.संदिप पि. मारोतराव देवकत्ते पाटील यांना संस्थेचा सभासद करून घेऊन वर नमुद प्लॉट क्र. ८५ चा दक्षिणेकडील भाग हा त्यांच्या नावे हस्तांतर करण्यास कोणाचा काही आक्षेप अथवा ऊजर असल्यास अथवा सदर प्लॉटवर कोणत्याही बँकेचा अथवा खाजगी संस्थेचा बोजा, गहाणखत अथवा इतर कोणतेही हितसंबंध असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसीध्द झाल्यापासुन ७ (सात) दिवसाचे आत संबंधितांनी आपला आक्षेप अथवा उजर संस्थेच्या बाबानगर कार्यालयात लिखित स्वरुपात सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. सबब सर्व जनतेच्या माहितीस्तव हे जाहीर प्रगटन प्रसिध्द केले आहे.

**मार्फत** **जाहीर प्रगटन देणार**
**ॲड.नरेश साहेबराव देशमुख** **अध्यक्ष/सचिव**
**राजेंद्रनगर नांदेड** **आनंदनगर सहकारी भाडेकरू**
**मो.९४२२१७००३०** **गृहनिर्माण संस्था म.असदुल्लबाद**

# झाडे लावा झाडे जगवा

## जाहीर प्रगटन

ग्रामपंचायत पिंपळगाव (तांडा) ता.हदगाव जि.नांदेड येथील वाद ग्रस्त लोकशाही दिनातील प्रकरण दिनांक ३/१२/२०२४ च्या वाद ग्रस्त प्रकरणाचा गट नंबर १२५ क्षेत्रफळ १ हेक्टर ०१ आर क्षेत्रात श्री जगदंम्बा ग्रह निर्माण संस्थेच्या जमिनीमध्ये गट क्र.१ २५ मध्ये अनाधिकृत ग्रामपंचायत ८ अ नोंदी गैरकानुनी दप्–तरी नोंद करून प्लॉटींग बाद काम करत असल्याने ग्रामपंचायत संमती लोक प्रति निधीची जिम्मेदारी रा–हील याची गांर्भियाने नोंद घेण्यात यावी अन्यथा नोंद नाही घेतल्यास पंचायत समिती कार्यालय ता.हदगाव संबधीत अधिकारी यांच्यावर उपरोक्त गैरकानुनी प्लॉटींग बादकामाची जिमेदारी राहील.

**श्री दिलीप सुराजी पवार**
**रा.पिंळगांव पो.घोगरी ता.हदगाव जि.नांदेड**
**मो.९६०४३३७८५६**

महाराष्ट्र शासन
**मृद व जलसंधारण विभाग,**
**महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छ. संभाजीनगर**
**प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, छ. संभाजीनगर**
जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नांदेड ई–मेल पत्ता –दुरध्वनी क्रमांक ०२४६२–२६०८१३

## ई–निविदा कार्यप्रणाली अंतर्गत
## ई – निविदा सुचना क्र. ब–१/१९ सन २०२४– २५

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा कार्यकारी अभियंता पद

जलसंधारण विभाग, नांदेड महाराष्ट्र शासन हे महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडील नोंदणीकृत निविदाकारांकडून खालील एव कामांकरिता ब–१ नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासना केतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदे सोबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याच्या अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नांदेड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचने मध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

ई निविदा उपलब्ध कालावधी– दिनांक २४.०२.२०२५ ते दिनांक ०३.०३.२०२५ (निविदा संच प्रमाणे)

ई निविदा उघडणे – दिनांक ०५.०३.२०२५ (निविदा संच प्रमाणे)

खालील संकेतस्थळावर ई–निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१.https://mahatenders.gov.in

(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

**(ए. एस. कांबळे)**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी, 'मृद व जलसंधारण विभाग नांदेड**




३४६१/२४-२५

## TENDER NOTICE.

All the manufactures, authorized dealers and retailers of technical material supplier of Smoke Fluid are here by informed to sypply Smoke fluid for Smoke Machines in Lts suitable for outdoor large area venue application in DMX controlled Machines used for Laser Show presentation at Gobind Baugh Garden Nanded. Required quantity 200 Liters of an appropriate brand and make of best quality and usable for Laser presentation as well.

Interested Parties are advised to quote the rates per litre, in desired sealed container supply. Quote the rate on your Firm /Agency Letter Head / Quotation.

Address the Quotation to The Superintendent Gurudwara Sachkhand Board, Nanded. Submit the quotation on or before Date 27-02-2025.

Right of rejecting any or all Quotations is theirto reserved with The Superintendent Gurudwara Sachkhand Board, Nanded.

Superintendent,
Gurudwara Sachkhand Board,Nanded.





# गोदातीर समाचार







# महसूल राज्य क्रीडा स्पर्धेमध्ये आठ जिल्ह्यांच्या झुंजी सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यस्तरीय महसूल क्रीडा स्पर्धेमध्ये शुक्रवारी उद्घाटनानंतर विविध स्पर्धांच्या झुंजीला सुरुवात झाली. आठ जिल्ह्यांच्या एकमेकांसोबत लढणार असून, यातील पहिल्या फेरीच्या लढती आज पहिल्या दिवशी नांदेडमधील विविध क्रीडांगणावर पार पडल्या.

राज्यस्तरीय स्पर्धेच्या निमित्ताने जवळपास दोन हजारांवर खेळा-डू या ठिकाणी दाखल झाले आहेत. खो-खोपासून लॉन टेनिसपर्यंत पाणी क्रिकेटपासून बुद्धिबळापर्यंत लढती सुरू झाल्या आहेत.

आज उद्घाटनानंतर सर्वप्रथम क्रिकेटच्या सामन्याला सुरुवात झाली. काल संभाजीनगरचा पराभव करून पुण्याने पहिला सामना जिंकला होता. आज सकाळी पहिल्या सत्रात भूमिअभिलेख आणि नोंदणी व मुद्रक विभाग विरुद्ध नाशिक विभाग या सामन्यात नाशिक विभाग हा ११२ धावांनी विजयी झाला. तर दुपारच्या दुसऱ्या सत्रामध्ये कोकण विभाग विरुद्ध नागपूर विभाग यांच्यामध्ये क्रिकेटची लढत झाली हा सामना कोकण विभागाने जिंकला.



टेबल टेनिस पुरुष एकेरीमध्ये अमरावती विरुद्ध छ. संभाजीनगर या लढतीत छ. संभाजीनगर तर नागपूर विरुद्ध भूमी अभिलेख व नोंदणी मुद्रांक विभाग यामध्ये नागपूर विभागाने लढत जिंकली आहे.

आज पहिला सामना सकाळी ११ वाजता इंदिरा गांधी मैदान स्टेडियम येथे पुरुषाच्या खो-खो स्पर्धेला सुरवात झाली. नागपूर विरुद्ध अमरावती विभाग संघाच्या लढतीत नागपूर विभाग विजयी झाला. दुपार सत्रात नाशिक विरुद्ध कोकण विभागात लढत झाली यात कोकण विभाग जिंकला. दुपार सत्रात छ. संभाजी नगर विरुध्द भूमी अभिलेख व मुद्रांक विभाग या लढतीत छ. संभाजी नगर यांनी हा सामना जिंकला.

पुरुष फुटबॉल खेळात अमरावती विरुध्द नाशिक संघाच्या सामन्यात नाशिक विभाग एका गोलने विजयी ठरले. कबड्डी पुरुष यामध्ये नाशिक विरुद्ध कोकण विभागाच्या सामन्यात कोकण विभागाने बाजी मारली. तर कॅरम पुरुष वैयक्तीक खेळामध्ये छ. संभाजीनगर विरुध्द कोकण विभागाच्या सामन्यात छ. संभाजीनगर विजयी ठरले. तसेच अमरावती विरुद्ध नोंदणी मुद्रांक व भूमी अभिलेख विभाग यांच्या सामन्यात अमरावती विजयी ठरले आहे.

बॅडमिंटन पुरुष एकेरी स्पर्धेत जिल्हा क्रीडा संकुल, इनडोअर हॉलमध्ये कोकण विभाग विरुद्ध नोंदणी मुद्रांक व भूमी अभिलेख सामन्यात कोकण विभागाने विजय मिळविला. तर नागपूर विरुद्ध नाशिक सामन्यात नागपूर विजयी ठरले. अमरावती विरुध्द पुणे या सामन्यात अमरावती विभागाने विजय मिळविला.

बॅडमिंटन पुरुष दुहेरीमध्ये अमरावती विरुद्ध नाशिक सामन्यात अमरावती विभागाने बाजी मारली आहे. तर छ. संभाजी नगर विरुद्ध कोकण विभाग यात छ. संभाजीनगरने बाजी मारली. लॉनटेनिस पुरुष एकेरीमध्ये नोंदणी मुद्रांक व भुमी अभिलेख विभाग विरुध्द नागपूर सामन्यात नागपूर विभागाने विजय मिळविला. छत्रपती संभाजीनगर विरुध्द नाशिक यांच्यामध्ये छ.संभाजीनगरने विजय मिळविला आहे. दुपार सत्रात पुणे विरुद्ध नोंदणी मुद्रांक व भूमी अभिलेख विभाग, नागपूर विभाग या सामन्यात पुणे विभागाने बाजी मारली आहे. कोकण विरुद्ध अमरावती यामध्ये अमरावती विभाग विजयी झाला.

लॉनटेनिस पुरुष दुहेरीमध्ये नोंदणी मुद्रांक व भूमी अभिलेख विभाग विरुद्ध अमरावती सामन्यात अमरावती विभागाने विजय मिळविला. तर नाशिक विरुद्ध कोकण सामन्यात कोकण संघाने विजय मिळविला. पुणे विरुध्द नागपूर संघाच्या लढतीत पुणे विभागाने बाजी मारली आहे.

लॉनटेनिस एकेरी ४५ वर्षावरील पुरुषाच्या सामन्यात अमरावती विरुद्ध नागपूर विभागाच्या सामन्यात अमरावती विभाग विजयी ठरला आहे. तर लॉनटेनिस दुहेरी ४५ वर्षावरील पुरुषाच्या सामन्यात नाशिक विरुद्ध छ. संभाजी नगर सामन्यात छ. संभाजीनगर विभागाने बाजी मारली. तर नागपूर विरुद्ध पुणे विभागाच्या लढतीत पुणे विभागाने विजय मिळविला आहे.

खो-खो महिलामध्ये नागपूर विरुध्द पुणे या लढतीत नागपूर विभाग सरस ठरला. नाशिक विरुध्द कोकण सामन्यात कोकण संघ जिंकला. तर थ्रो बॉल महिला या खेळात नोंदणी मुद्रांक व भूमी अभिलेख विभाग विरुध्द नागपूर लढतीत नागपूर विभाग विजयी ठरला. तर अमरावती विरुद्ध कोकण विभागाच्या लढतीत कोकण विभागाने बाजी मारली आहे.

# अर्धापूर येथे आज रोजगार मेळावा

## खा. अशोकराव चव्हाण व मंत्री बोर्डीकर यांची उपस्थिती

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** विधानसभा निवडणुकीत दिलेल्या अभिवचनाची पूर्ती करणारा व भोकरच्या आ. श्रीजया चव्हाण यांच्या संकल्पनेतून साकारलेला रोजगार मेळावा उद्या, दि. २२ फेब्रुवारी रोजी अर्धापूर येथील डॉ. शंकरराव चव्हाण महाविद्यालयाच्या मैदानावर सकाळी ९ वाजता होणार आहे. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण हे राहणार असून, मेळाव्याचे उद्घाटन राज्याच्या सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण व महिला आणि बालविकास राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, अण्णासाहेब पाटील आर्थिक







विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

शिक्षण आणि रोजगार या संदर्भात आपल्या आमदारकीच्या काळात काम करू, असे अभिवचन निवडणुकी दरम्यान आ.श्रीजया चव्हाण यांनी दिले होते. याच अभिवचनाची पूर्तता करण्यासाठी अर्धापूर येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात देशातील १२० पेक्षा अधिक वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या नामांकित कंपन्या सहभाग घेत आहेत. सुशिक्षित बेरोजगार युवक, युवतींनी मोठ्या प्रमाणात मेळाव्यासाठी ऑनलाईन नोंदणी केली आहे. या मेळाव्याचा जास्तीत जास्त बेरोजगार युवक, युवतींनी फायदा घ्यावा, असे आवाहन रोजगार मेळाव्याच्या संयोजिका आ. श्रीजया अशोकराव चव्हाण यांनी केले आहे.

# पहिल्याच दिवशी दहावीच्या परीक्षेला ५७८ विद्यार्थ्यांची दांडी; १७२ केंद्रांवर बंदोबस्तात परीक्षा सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)–** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या पहिल्याच दिवशी नांदेड जिल्ह्यात जवळपास २२ हजार ८७८ विद्यार्थ्यांनी मराठी विषयाची परीक्षा दिली आहे. १७२ केंद्रांवर घेण्यात आलेल्या परीक्षेत ५७८ विद्यार्थ्यांनी दांडी मारल्याचे दिसून आले. केंद्रांवर बैठे पथक त्याचबरोबर भरारी पथक नेमण्यात आले असून, कडेकोट बंदोबस्तात दहावीच्या परीक्षांना प्रारंभ झाला.

दहावी परीक्षेसाठी शुक्रवार, दि. २१ रोजी सकाळी ९ वाजल्यापासूनच विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रांवर गर्दी केली होती. अनेक केंद्रांवर परीक्षेला येणाऱ्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. परीक्षा केंद्रांवर कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला असून, कोठेही अनुचित प्रकार घडणार नाही याची खबरदारी जिल्हा शिक्षण विभागाने घेतली आहे. दहावी व बारावीची परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी संवेदनशील परीक्षा केंद्रांवर विशेष पथक नेमण्यात आले आहे. त्याचबरोबर जिल्ह्यातील अधिकारी अचानक भेटी देवून तपासणी करत आहेत. या दरम्यान कुठे अनुचित प्रकार आढळून आल्यास तात्काळ कार्यवाही करण्यात येईल, असे शिक्षण विभागाच्यावतीने सांगण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांनी निर्भयपणे परीक्षेला सामोरे जावे. कॉपीमुक्तीसाठी सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी कॉफीमुक्तीचे आदेश दिले असून त्याची अमलबजावणी प्रत्येक केंद्रांवर काटेकोरपणे करण्याचा प्रयत्न शिक्षण विभागाने केला आहे.

# वाळूची अवैध वाहतूक; ६ टिप्पर पकडले

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस व महसूल विभागाच्या पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीवरुन गुरुवारी मध्यरात्री नाळेश्वर परिसरात लिंबगाव ठाण्याच्या हद्दीत जवळपास वाळूसह तीन हायवा व तीन टिप्पर असा एकूण ९१ लाखांचा मुद्देमाल महसूल व पोलिसांच्या पथकाने जप्त केले आहेत. या दरम्यान वाळू तस्कर व पोलीस महसूल अधिकाऱ्यांसोबत वादविवाद झाल्याची चर्चा सुरु आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या आदेशानुसार अवैध वाळू तस्करांविरुद्ध कारवाईची मोहीम सुरु आहे. गुरुवारी महसूलचे पथक व लिंबगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मुंजाजी दळवे यांच्या पथकाने वाळू तस्करांविरुद्ध कारवाई केली. नाळेश्वर परिसरातून वाळू तस्करी होत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर गुरुवारी मध्यरात्री सदर पथकाने वाळूची वाहतूक करणारे तीन हायवा व तीन टिप्पर पकडून पोलीस ठाण्यामध्ये जमा केले आहेत.

सदर कारवाईत जवळपास ९१ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या दरम्यान वाळू तस्करांनी काही वेळ गोंधळ घातल्याची चर्चा सोशल मीडियावर गुरुवारी रात्रभर सुरु होती. सदर कारवाईमुळे वाळू तस्करांचे धाबे दणाणले असून लिंबगाव पोलीस ठाण्यामध्ये याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाईत महसूलचे मंडळ अधिकारी जगताप, तलाठी रणवीर, सहाय्यक पोलीस निरीक्षक मुंजाजी दळवे व त्यांच्या सहकाऱ्यांनी कामगिरी केली आहे. या कामगिरीबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सदर पथकाचे अभिनंदन केले आहे.

# दीड लाख रुपये ऐवज असलेली बॅग चोरट्यांनी पळविली

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या गुरु ग्रंथ साहेब भवन यात्री निवास येथील एका कौटुंबिक कार्यक्रमा-साठी आलेल्या पाहुण्याचे एक लाख ६४ हजार ८१८ असलेली बॅग अज्ञात चोरट्यांनी लंपास केली. ही घटना १४ ते १५ फेब्रुवारीच्या दरम्यान घडली.

शहराच्या भगतसिंग रस्त्यावरील राहणारे दर्शनसिंग चंदासिंग सिद्धू (वय ४७) यांच्या मुलीच्या साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी बाहेरगावाहून काही पाहुणेमंडळी आली होती. त्या कार्यक्रमात नातेवाईकांनी त्यांच्या मुलीला भेटवस्तू म्हणून दिलेले नगदी दहा हजार रुपये, सोन्याचा हार जवळपास एक लाख ५१ हजार ८१८ रुपये तसेच एक ३००० रुपयाची मनगटी घडी असा एक लाख ६४ हजार ८१८ ऐवज असलेली बॅग अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली.

दर्शनसिंग चंदासिंग सिद्धू यांच्या फिर्यादीवरून वजिराबाद पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार नागरगोजे करत आहेत

# सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळ्यात रमेश पवार यांच्या पाच समाजोपयोगी पुस्तकांचे प्रकाशन

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वारातीम विद्यापीठातील बहि:शाल शिक्षण केंद्राचे व्याख्याते तथा मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव रमेश पवार यांच्या पाच पुस्तकांचे प्रकाशन मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, ,जिजाऊ ब्रिगेड व ३२ कक्ष नांदेड आयोजित सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळ्यात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी खा. रविंद्र पाटील चव्हाण, माजी उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री डी. पी. सावंत, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी आमदार मोहनअण्णा हंबर्डे, मराठा समाज भूषण माधवराव पाटील शेळगावकर, काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष बी. आर. कदम, उद्योगपती मारोतराव पाटील कवळे, माजी सनदी अधिकारी अनिल मोरे,



राज्याचे पूर्व शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे, डॉ, रेखाताई चव्हाण, माजी महापौर जयश्रीताई पावडे, इंजि. तानाजी हुस्सेकर, प्रा. संतोष देवराये, माजी सभापती संजय पाटील शेळगावकर, नानाराव कल्याणकर, उध्दवराव सूर्यवंशी, डॉ. सुनील कदम आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

लेखनासाठी प्रेरणा युगनायक ॲड. पुरुषोत्तम खेडेकर यांच्यामुळे मिळाली असल्याचे लेखक रमेश पवार यांनी प्रास्ताविकात सांगितले. अत्यंत समाजोपयोगी या पाच पुस्तकांचे प्रकाशन झाल्याबद्दल लेखकाचे मराठा सेवा संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक मधुकरराव देशमुख, राष्ट्रीय अध्यक्ष कामाजीराव पवार, इंजि. शे. रा. पाटील, पूर्व शिक्षणाधिकारी शिवाजीराव खुडे, डॉ. सोपानराव क्षीरसागर, प्रा. डॉ. पंजाबराव चव्हाण, प्रा. संतोष देवराये, इंजि. शिवाजीराजे पाटील, इंजि तानाजी हुस्सेकर, पूर्व शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे, पूर्व अति. मु.का. अ. शिवाजीराव कपाळे, प्रा. डॉ. हनुमंत भोपाळे, नानाराव कल्याणकर, उध्दवराव सूर्यवंशी, भगवानराव ताटे, शिवाजी पाटील आलेगावकर, शिवा कांबळे, पंडित पवळे, व्यंकटराव जाधव, माजी जिल्हाध्यक्ष पंडितराव कदम चिखलीकर, भंडारा जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी रविंद्र सोनटक्के, नांदेड जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे, गटशिक्षणाधिकारी सतिश व्यवहारे, देविदासराव बस्वदे, अशोक पाटील, सुधाकर थडके, बंडू पाटील, ॲड. बालाजी वाघमारे, संकेत पाटील, परमेश्वर पाटील, सुभाष कोल्हे, बालाजी सिरसाट, कृष्णाताई मंगनाळे, सुरेखाताई रावणगावकर, डॉ. भारतीताई मढवई, अरूणाताई जाधव, डॉ. विद्याताई पाटील, सुमित्राताई वडजकर, कल्पनाताई चव्हाण, अर्चनाताई होगे, वनिताताई देवसरकर आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# डॉ. लखमावार यांनी बिलोली उपजिल्हा रुग्णालय घेतले दत्तक

**बिलोली (प्रतिनिधी)–** बिलोली शहरासह तालुक्यातील रुग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात म्हणून सध्या परभणी येथील जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार यांनी शासनाच्या आदेशानुसार बिलोली येथील उपजिल्हा रूग्णालय दत्तक घेतले आहे. नव्या रूपाने डॉ. लखमावार हे पुन्हा बिलोली येथील शासकीय रुग्णालयाकडे लक्ष देणार असून, त्यांच्या या भूमिकेमुळे बिलोली परिसरातील रुग्णांची गैरसोय दूर होईल, असा विश्वास परिसरातील नागरिकांनी व्यक्त करून अनेकांनी समाधान व्यक्त केले आहे.

नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद तालुक्यातील रहिवासी असलेल्या डॉ. नागेश लखमा-वार यांनी बिलोली शहरातील तत्कालीन ग्रामीण रूग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक म्हणून अनेक वर्ष सेवा दिली होती. डॉ. लखमावार यांनी त्यांच्या सेवा काळात बिलोली ग्रामीण रूग्णालयातील साफ सफाई, स्वच्छता, कार्यालयीन नीटनेटकेपणा व ग्रामीण रुग्णालयात येणाऱ्या सर्व रूग्णांना उत्तम आरोग्य सुविधा मिळाव्यात या बाबींकडे स्वतः बारकाईने लक्ष देणार आहेत.

बिलोली ग्रामीण रुग्णालयास राज्य पातळीवरील अनेक पुरस्कार मिळवून देत रूग्णालयास नावारूपास आणले होते. बिलोली येथे वैद्यकीय अधीक्षक म्हणून कार्य करीत असताना डॉ. नागेश लखमावार यांची परभणी येथे जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून पदोन्नती मिळाली आहे. परभणी येथे पदोन्नती झाल्यानंतर आता डॉ. नागेश लखमावार पुन्हा बिलोली येथील उप जिल्हा रूग्णालयात सक्रिय होणार आहेत. कारण शासनाच्या वतीने राज्यातील नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी सध्या कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना त्यांच्या पूर्वीच्या रूग्णालयात केलेल्या कामाचा अनुभव त्या रूग्णालयास मिळावा व त्या रूग्णालयातील आरोग्य सेवा, सोई-सुविधा व रूग्णालयाचा दर्जा वाढावा यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रथम नियुक्तीचे रूग्णालय दत्तक घेण्याची योजना आखली आहे. यानुसार परभणीचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार यांनी बिलोली येथील उप जिल्हा रूग्णालय दत्तक घेतले आहे.

डॉ. नागेश लखमावार यांच्या वेगळ्या भूमिकेत का होईना पण पुन्हा बिलोली रूग्णालयात त्यांच्या येण्याने बिलोली शहरासह तालुक्यातील रूग्णांसह अनेकांनी स्वागत केले आहे.




# नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांचा दौरा

**नांदेड (प्रतिनिधी)** अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष (मंत्री दर्जा) नरेंद्र अण्णासाहेब पाटील हे नांदेड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

शुक्रवार, दि. २१ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजीनगर येथून रात्री शासकीय विश्रामगृह नांदेड येथे आगमन व मुक्काम. शनिवार २२ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वा. शंकरराव चव्हाण महाविद्यालय अर्धापूरकडे प्रयाण व रोजगार मेळाव्यास उपस्थिती. दुपारी २ वाजतर शासकीय विश्रामगृह नांदेडकडे प्रयाण. दुपारी २ ते ३.३० वाजेपर्यंत शासकीय विश्रामगृह येथे राखीव. दुपारी ३.३० वा. नांदेड विमानतळाकडे प्रयाण व तेथून पुणेसाठी प्रयाण करतील.

# जिल्हाधिकारी राऊत यांचा आज कार्य गौरव

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावत नांदेड जिल्ह्याच्या प्रशासकीय सुधारणांसह जनतेच्या हिताची असंख्य कामे करणाऱ्या माजी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांचा नांदेडकरांच्या वतीने आज दिनांक २२ फेब्रुवारी रोजी कार्य गौरव करण्यात येणार आहे. शासकीय विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्य गौरव सोहळ्याला नांदेडकरांनी उपस्थित राहावे, असे आवाहन नांदेडकर ग्रुपच्या वतीने करण्यात आले आहे.



जिल्हाधिकारी अभिजीत राऊत हे नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून रुजू झाल्यानंतर नांदेड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला एक नवी गती मिळाली होती. सर्व-सामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठीही जिल्हाधिकारी म्हणून राऊत यांनी केलेले कार्य उल्लेखनीय असे राहिले आहे. शासन, प्रशासन आणि जनता यांच्यामध्ये समन्वय निर्माण करून शासकीय योजना त्या त्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी ही जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावली होती. नांदेड जिल्ह्याचा उत्कृष्ट कार्यभार सांभाळणाऱ्या अभिजीत राऊत यांची नुकतीच बदली करण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी म्हणून त्यांची बदली झालेली असली तरी नांदेडकरांचे आणि त्यांचे ऋणानुबंध कायम राहतील या अनुषंगाने माजी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांचा कार्य गौरव करण्यासाठी नांदेडकरांच्या वतीने शनिवार, दि. २२ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता शासकीय विश्रामगृह नांदेड येथे कार्य गौरव सोहळा आयोजित केला आहे. या कार्य गौरव सोहळ्याला नांदेडकरांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत १४ परीक्षा केंद्रांवर दहावी परीक्षेला प्रारंभ

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ लातूर विभागाच्या वतीने दहावी शालांत परीक्षेला ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत १४ केंद्रांवर २१ फेब्रुवारीपासून सुरूवात झाली आहे. पहिल्या दिवशी मराठी, ऊर्दू विषयांची २७६८ विद्यार्थी परीक्षा देत आहेत. परीक्षा केंद्रांवर ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ लातूर विभागाच्या वतीने २१ फेब्रुवारीपासून शालांत दहावी परीक्षेला प्रारंभ झाला आहे. ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील शिवाजी हायस्कूल सिडको, जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय विष्णुपुरी, कुसुमताई माध्यमिक विद्यालय सिडको, इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय सिडको, महात्मा गांधी महाविद्यालय सिडको, शिवशक्ती माध्यमिक विद्यालय काकांडी, श्री मधुबन महाराज विद्यालय धनेगाव, राष्ट्रमाता मराठी उर्दू माध्यमिक विद्यालय वाजेगाव, शिवाजीराव पाटील हायस्कूल वाजेगाव, शांती निकेतन पब्लिक स्कूल सिडको, महात्मा फुले पोस्ट बेसिक अश्राम शाळा वाघाळा, माधवराव वटेमोड विघालय जुना कौठा, नरहर कुरुंदकर महाविद्यालय जुना कौठा, गोदावरी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पिंपळगाव निमजी या केंद्रावर परीक्षांना सुरूळीत सुरूवात झाली असून, पहिल्या दिवशी शिवाजी हायस्कूल केंद्रावर परीक्षार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी केंद्रप्रमुख म्हणून जी. बी. ढवळे, एस. पी. पांडे, एन. एम. वडजे, जाधव एस. पी., श्रीमती आडे एस. बी., विजय वाघमारे, पाटील व्ही. एस, कंकरे ए. के, एन. एम. ए. खदीर, सौ. शेळके, एस. एल. डॉ. ए. डी. गरड जी. एस. महंमद, भगवान वटेमोड हे कार्यरत आहेत. भरारी, बैठे पथक यांनी परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या असल्याचे वृत्त असून, तणावमुक्त व कॉपीमुक्त वातावरणात परीक्षेला प्रारंभ झाला आहे. परीक्षा केंद्रावर पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली एक अधिकारी, पोलीस अंमलदार, महिला पोलीस कर्मचारी, होमगार्ड व महिला होमगार्ड यांच्या नियुक्ती करण्यात आल्या आहेत.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com